विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१६ |
| वर्ष | : | एक्कावनवे |
| अंक | : | दुसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१६**

**गणपत्रिका क्रमांक : १८८**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
## त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : एक्कावनवे अंक : दुसरा ज्येष्ठ/आषाढ शके १९३८, जुलै २०१६

## *संपादकीय*

## वसाहतवाद, धर्मप्रसार आणि भारतीय संस्कृती

इंग्लंडमध्ये युरोपियनसंघामध्ये राहायचे की बाहेर पडायचे यासंदर्भात एक सार्वत्रिक कौल नुकताच घेण्यात आला(Referendum). इंग्लंडमध्ये जनता या संदर्भातील 'होय' आणि 'नाही' या गटामध्ये जवळ जवळ समसमान विभागली गेली होती. सर्वप्रमुख राजकीय पक्षही या दोन्हीही गटात विभागले गेले होते. त्यामुळे खऱ्या अर्थाने हा 'राजकीय' कौल नाही तर 'जनमत' कौल होता. अवघी २% मतं जास्त पडून ब्रिटिश नागरिकांनी युरोपियन संघातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय योग्य की अयोग्य हे पुढील काळच ठरवील. दुर्दैवाने ब्रिटिश लोकसभेच्या एका सभासदाची हत्या वगळता, हा सगळा प्रकार आणि चर्चा ही परिपक्व, आणि लोकशाही मूल्यांचा आदर करणारी होती. विजयी आणि पराभूत नेत्यांनी या निर्णयावरती दिलेली मते ही अत्यंत संयमित आणि सभ्य समाजाला शोभतील अशीच होती. भारतामध्येही लोकशाहीच आहे. लोकशाही म्हणजे विचारस्वातंत्र्य असेही आपण मानतो. दुर्दैवाने, भारतामध्ये आज 'स्वातंत्र्य' नक्कीच आहे; पण ते विचारपूर्वक, रचनात्मक दृष्टीने विचार मांडण्यापेक्षा 'टिंगल', 'टवाळी', 'बेताल' वक्तव्य, आणि हे कमी पडते म्हणून की काय 'गुद्या'नीही व्यक्त करण्याकडे जास्त आहे!

इंग्लंडने जगाला लोकशाही दिली असा समज आहे. याच इंग्लंडचे साम्राज्य इतके मोठे होते की, त्यावर 'सूर्य कधी मावळत नाही' असे म्हटले जायचे. महाराष्ट्रापेक्षा, क्षेत्रफळ आणि लोकसंख्येने कमी असलेल्या इंग्लंडची लोकसंख्या, जागतिक लोकसंख्येच्या फक्त १% आहे, तर भारताची लोकसंख्या जागतिक लोकसंख्येच्या १७% आहे. इंग्लंडची 'ईस्ट इंडिया' कंपनी आणि राणीने मिळून जवळ जवळ ३५० वर्ष भारतावर राज्य केले.

(पृष्ठ क्र. २८ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ $ दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता) .५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

५) **दि. १ एप्रिल २०१५ पासून मनीऑर्डरने पैसे पाठविता येणार नाहीत.**

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया SBI | जे के ग्राम, ठाणे (प.) | **10884930955** | **SBIN 0009056** |
| ठाणे जनता सहकारी बँक TJSB | खोपट, ठाणे (प.) | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| ठाणे भारत सहकारी बँक लि. TBSB | मुख्य शाखा,ठाणे (प.) | **002115000024520** | **TBSB 0000002** |

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

देणगी खालील ठिकाणी ही स्वीकारली जाते.

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**, कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : २३८८०६४५ (रविवारी बंद) येथे **फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी धनादेश पाठवू नये.**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित**, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४००६०१. दूक्र : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५
अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेला असतो.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम्। परल्यां वैजनाथं च। परळी वैजनाथ | ५ |
| वामनाची गोष्ट | ७ |
| गीतकृष्णायन-भाग ४- युगपुरुष | ११ |
| ज्येष्ठ व आरोग्य | १४ |
| मरणोत्तर जीवन आणि पुनर्जन्म सिद्धांत | १७ |


या अंकात इतरत्र ठाणे येथील व्यास क्रिएशन यांनी घेतलेल्या एका निबंध स्पर्धेसाठी श्री. भा. द. भांड यांनी लिहिलेला निबंध आपल्या देणगीदारांच्या वाचनासाठी छापला आहे. तो वाचल्यावर आपणास कांही नवीन विषय, विचार सुचल्यास ते सध्दर्म वाचकांसमोर मांडले जावेत असे वाटत असेल तर अधिक तपशीलासह कृपया सध्दर्मशी संपर्क साधावा अशी विनंती आहे. आपणांस कांही लेख पाठवायाचे असल्यास तेही पाठवावेत. संपादकांच्या अनुमतीने योग्य असल्यास, आवश्यकता वाटल्यास योग्य ते संपादकीय संस्कार करून छापले जातील. सर्व देणगीदारांस नम्र विनंती - बँकेत परस्पर जमा रकमेचा ते पैसे कोणी भरले आहेत याचा तपशील दिला जात नसल्याने देणगीदाराच्या नांवावर पैसे जमा करता येत नाहीत, पण न्यासाच्या हिशोबात योग्य प्रकारे नोंद घेतली जाते. गेल्या आर्थिक वर्षात ५ ते ७ अशा नोंदी आहेत, त्या कमी करण्याचा आमचा प्रयत्न असतो. आपण सहकार्य करावे. सध्दर्मच्या दैनंदिन कामासाठी ५० ते ६० वयोगटातील स्वयंसेवी व्यक्तिच्या शोधात आहोत. इच्छूकानी संपर्क साधावा.

**- संपादक**

**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

१) सुलभ संध्या व पूजा — रु. ५
२) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि — रु. ५
३) हरितालिका पूजा विधि — रु. १०
४) श्री सत्यनारायण पूजा व कथा — रु. १५
५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) — रु. १०
६) तुलसी विवाहविधि — रु. १०
७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) — रु.२५
८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक रु.१५
(या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्‌बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.)
९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) रु.३०
१०) उपासना — रु. ४०
११) श्रीरामरक्षेतील व्याकरण — रु. ५०
१२) चांगदेव पासष्टी — रु. ४०
१३) गंगालहरी — रु. २५
१४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण — रु. ३०
१५) सांख्यदर्शन — रु. ३०
१६) श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) — रु. १५

**एप्रिल ते जून २०१६**

**दीर्घकालीन सभासद (दी. का.)**

मराठे सदाशिव बळवंत, बडोदा
जोशी मधुकर कृष्णाजी, डोंबिवली

**विशेष देणगी**

वैद्य मुकुंद श्रीकृष्ण, बदलापूर - रु.५००/-

**- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख २७ वा

**करस्थमुदकं त्यक्त्वा, घनस्थमभिलषति।**[३४०]
**हातचे सोडून पळत्याच्या पाठीमागे धावतो**

**सुभाषित :**

**सिद्धमन्नं परित्यज्य भिक्षामटति दुर्जनः।।**

समोर वाढलेले ताट टाकून भीक मागायला जातो.

**लोकः प्रयागवासी कूपे स्नानमाचरति।**[३४१]

पिकते तिथे विकत नाही.

गंगा, सिंधु व सरस्वती यांचा संगम म्हणून प्रयागराज हे तीर्थ पवित्र स्नानासाठी अनादिकालापासून प्रसिद्ध आहे. पण तिथे स्थायिक झालेले लोक मात्र विहिरीच्या पाण्याने स्नान करतात असे का? तर अतिपरिचयादवज्ञा मलय पर्वतावरील भिल्लीण चंदनाची लाकडे इंधन म्हणून वापरते. मलये भिल्लपुरन्ध्री चन्दनतरु काष्ठमिन्धनं कुरुते।

**संशयात्मा विनश्यति।**[३४२]

प्रत्येक बाबतीत सतत संशय घेणारी माणसे सुखी होत नाहीत.

**सुभाषितः**

**अज्ञाश्चाश्रद्दधानाश्च संशयात्मा विनश्यति।**
**नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः।।**

ज्याना शास्त्रप्रामाण्यबद्दल संशय आहे असे अज्ञानी व श्रद्धाहीन लोक विनष्ट होतात. संशयी लोकांना या लोकी व परलोकी सुख लागत नसते.

**यत्र यथा स्थितिः तत्र तथैव आचरेत्।**[३४३]

देश तसा वेश. पाण्यात राहून माशाशी वैर करू नये.

**सुभाषित :**

**यस्मिन् देशे य आचारः, स्थाने स्थाने यथा स्थितिः।**
**तत्र तथैव व्यवहर्तव्यं, परम्पर्यागतो विधिः।।**

**आयादल्पतरो व्ययः।**[३४४]

अंथरुण पाहून पाय पसरावेत.

**सुभाषित :**

**इदमेव हि पाण्डित्यं, चातुर्यमिदेव हि।**
**इदमेव हि सुबुद्धित्वम् आयादल्पतरो व्ययः।।**

अहो उत्पन्नापेक्षा खर्च कमी असावा यातच खरे बुद्धिचातुर्य आणि शहाणपण आहे.

**यद्यदात्मवशं कर्म, तत्तद्यत्नेन आचरेत्।**[३४५]

१) अपना हाथ जगन्नाथ. २) जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला. ३) Self-reliance is the master-key to success स्वावलंबन ही यशाची गुरुकिल्ली.

**सुभाषित :**

**यद्यत्परवशं कर्म, तत्तद्यत्नेन वर्जयेत्।**
**यद्य दात्मवशं तु स्यात्तत्तत्सेवेत यत्नतः।।**

**सर्वमुत्पादि भङ्गुरम्।**[३४६]

सर्व काही नाशवंत आहे.

(पृष्ठ ६ वर)

पूर्वोत्तरे प्रज्वलिकानिधाने
सदा वसन्तं गिरिजासमेतम्।
सुरासुराधितपादपद्मं
श्रीवैद्यनाथं तमहं नमामि॥५॥

अन्वय : अहं तं वैद्यनाथं नमामि यः सदा गिरिजासमेतं पूर्वोत्तरे प्रज्वलिकानिधाने वसन्तम् अस्ति। यस्य पादपद्मं सुर-असुर-आराधितं च अस्ति।

अन्वयक्रमानुसार :- रुपे, समास, शब्दार्थ व व्याकरण.

वैद्यनाथम् - वैद्यानां नाथः वैद्यनाथः, तम्। वैद्यनाथाला.

टीप - समुद्रमंथनात धन्वंतरी आणि अमृत निघाल्याचे सर्वविदित आहे. जेव्हा राक्षस अमृतासाठी धावले तेव्हा विष्णूने अमृतासह धन्वंतरीला शंकराच्या पिंडीत गुप्त केले. त्यामुळे ह्याला अमृतेश्वर अथवा वैद्यनाथ हे नाव प्राप्त झाले.

नमामि - नम् ह्या धातूला द्वितीयेची अपेक्षा म्हणून वैद्यनाथं. पण नमस् हे अव्यय योजले तर चतुर्थी, वैद्यानाथाय नमः।

गिरिजासमेतम् - गिरौ जाता इति गिरिजा-पार्वती. तया समेतम् गिरिजा-समेतम्-पार्वतीबरोबर.

पूर्वोत्तरे-पूर्वस्याः उत्तरस्याश्च दिशोरन्तरालम् पूर्वोत्तरा दिग्बहुव्रीहि तस्याम् पूर्वोत्तरे ईशान्येला.

प्रज्वलिकानिधाने - प्रज्वलिका इति निधानम् तस्मिन्-चिताभूमीत वसन्तम्- वस् राहणे राहणारा (त्याला मी नमस्कार करतो)
पादपद्मम्-पादयोः पद्मम्-दोन पाय रुपी कमळ

सुरासुराराधितम् - सुराः च असुराःच सुरासुराः देव आणि दानव तैः आराधितः पादपद्मं यस्य सः। देव आणि दानव यांनी ज्याच्या पायरूपी कमळाची आराधना केली आहे (त्या देवाला) तम्।

भावार्थ :- मी त्या वैद्यनाथाला नमस्कार करतो जो गिरीजेबरोबर सतत ईशान्येला असलेल्या प्रज्वलिका या ठिकाणी राहतो. ज्याच्या पादपद्मांची देव आणि दानव आराधना करतात.

वैजनाथ - रावण कैलासाहून आत्मलिंग लंकेला घेऊन जात होता. तेव्हा गणपतीने वैजू नाम धारण करून गुराख्याचे रुप घेतले व मोठ्या युक्तीने रावणाकडून आत्मलिंग घेऊन जमिनीवर ठेवले. ते तिथेच घट्ट बसले व रावण ते काढू शकला नाही व ही कथा परळीत घडली व त्याला वैजू-वैजनाथ जोडले गेले व परळी-वैजनाथ असे नाव पडले.

बीड जिल्ह्यात आंबेजोगाईपासून १३ किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. एम. एस. इ. बी. चे वीजनिर्मितीचे भव्य थर्मलस्टेशन येथेच आहे. गावाजवळच उंचावर वैद्यनाथाचे चिरेबंदी भव्य मंदीर आहे. वैद्यनाथाची पिंडी शाळीग्रामशिलेची असून ती फारच मऊ भव्य

व प्रसन्न आहे. अहिल्याबाई होळकर यांनी ह्या मंदिराचा जीर्णोद्धार केला होता. श्रीमंत पेशव्यांनी या देवस्थानाच्या व्यवस्थेसाठी मोठी जमीन इनाम म्हणून दिली होती.

महाराष्ट्रातील हे स्थान बारा ज्योर्तिलिंगापैकी आहे. श्लोकातील वृत्त 'उपजाति' आहे. 'इउउइ' हा प्रकार आहे. कारण पहिल्या पादात इन्द्रवज्रा, दुसऱ्या व तिसऱ्या पादात उपेन्द्रवज्रा व चौथ्या पादात इन्द्रवज्रा आहेत. ह्यांची अद्याक्षरे म्हणजेच इउउइ.

उपजाति हे वृत्त उपरोक्त दोन वृत्तांच्या मिश्रणाने होते. प्रत्येक पादात ११अक्षरे असतात. हे समवृत्त आहे व यति ५ व्या अक्षरावर व पादान्ती असते.

इति कल्याणमस्तु।

क्रमशः।

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

(पृष्ठ क्र. ४ वरून..**संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार ...**)

**सुभाषित :**

कायः सन्निहितापायः संपदा पदमापदम्।
समागमः सापगमाः सर्वमुत्पादि भङ्गुरम्।।

**शब्दार्थ :** कायः-शरीर, सन्निहित-अनिवार्य, उत्पादि-निर्माण झालेले, समागमः- भेट, अपगमः- वियोग

शरीराचा नाश होणे अटळ आहे. संपत्ती हे विपत्तीचे माहेर आहे. भेट आहे तिथे वियोग ठेवलेलाच आहे. जे उत्पन्न झाले आहे ते नाशवंत आहे.

**स्थानं प्रधानं न बलं प्रधानं।**[३४७]

**सुभाषितः**

**जानामि नागेन्द्र तव प्रभावम्**
**कंठे स्थितो गर्जसि शंकरस्य।**
**स्थानं प्रधानं न बलं प्रधानं**
**स्थाने स्थितः काऽपुरुषोऽपि शूरः।।**

**कापुरुषः - कुत्सितः पुरुषः।**

हे नागश्रेष्ठा तुझी ताकद मला माहीत आहे. जो पर्यंत तुला शंकराच्या गळ्यात स्थान मिळाले आहे तो पर्यंतच तुझा प्रभाव. कारण एखाद्याला स्थानामुळेच महत्त्व असते. उच्च स्थानावर एखाद्या सामान्यालाही शूरत्व प्राप्त होते.

इति शिवम्।

क्रमशः

**दि. दा. औटी**

●●●

## १३. बटूचें विराट रुप

बलिराजानें वामनाच्या हातावर उदक सोडण्यासाठीं पाण्याची झारी आपल्या हातीं घेतली त्या वेळीं गुरु शुक्राचार्य विंध्याचल पर्वतावर सिद्धि प्राप्त करून घेण्यासाठीं तपश्चर्या करीत बसला होता. त्यानें बलिराजाच्या महालांतील सर्व प्रकार अंतर्ज्ञानानें जाणला आणि सूक्ष्म देह धारण करून तो त्वरेनें बलिराजाच्या महालांत प्रविष्ट झाला.

बलि आतां आपल्या झारीनें वामनाच्या हातावर तीन पावलें भूमीचें उदक सोडत आहे असें पाहून तो सूक्ष्मदेहधारी शुक्राचार्य झटकन त्या झारींत शिरला आणि तोटीच्या तोंडाशी लपून बसला.

राजानें वामनाच्या हातावर झारी वांकडी केली. पण पाणी पडेना!

ह्या वेळीं माया बाजूला राहून हा सारा प्रकार मुकाट्यानें पाहात होती. झारींतून पाणी पडत नाहीं असें दिसतांच त्या बालबुद्धि पोरीनें पटकन् जमिनीवर पडलेली दर्भाची एक काडी घेतली आणि ती झारीच्या तोटींत खुपसली.

त्याबरोबर कांहींतरी फुटल्याचा आवाज होऊन पाणी सळकन् वामनाच्या हातावर पडूं लागलें!

काडी तोटींत खुपसतांच जो आवाज झाला तो ऐकून बिचारी माया घाबरुन दूर पळून गेली.

आवाज कसला झाला म्हणून सर्वजण इकडेतिकडे पाहातात तों त्यांना बाजूला येऊन उभा राहिलेला गुरु शुक्राचार्य दिसला. पण त्याचा डोळा फुटलेला असून त्यानें आपल्या कपाळाला हात लावला होता!

आपल्या साऱ्या सिद्धि खर्ची घालून आपण आपल्या ह्या शिष्याला दक्षिणापथाचे स्वामी बनविलें आणि दानशूर म्हणून दिगंतांत त्याचा लौकिक करविला! पण अखेर आपल्या मूळच्या दैत्य स्वभावावर जाऊन अहंकारापायीं तो आतां स्वतःवर अरिष्ट ओढवून घेत आहे, असें वाटून शुक्राचार्यांनें कपाळाला हात लावला होता, कीं डोळा फुटल्याबद्दल तो शोक करीत होता, कोणास ठाऊक?

कांहींही असो. पण तें पाहाण्यासाठीं पोर माया आतां तेथें उभी नव्हती एवढें मात्र खरें.

हातावर उदक पडतांच बटूचा देह वाढत गेला. प्रचंड रूप धारण करून त्यानें एका पावलाने अवघी पृथ्वी व दुसऱ्या पावलानें सारें अंतरिक्ष व्यापून टाकलें!

वामनानें धारण केलेलें तें विराट रुप पाहून महालांतील सारे दैत्यसेवक भयभीत होऊन पळत सुटले!!

बलि दिङ्मूढ होऊन अनंत अशा त्या रूपाकडे पाहातो तो बटूच्या पोटांत त्याला आपलें भरभराट पावलेलें सारें राज्य, यांतील युद्धासाठीं नेहमीं उत्सुक असलेली दैत्यसेना आणि विषयसुखांसाठीं धडपड करणारी आपली अगणित प्रजा दिसली!!

डोळे दिपल्यानें बलि खालीं पाहूं लागला. तों त्या विश्वमूर्ति बटूच्या पावलांखालीं त्याला

दैत्यांचें क्रीडास्थान असलेलें रसातळ दिसलें आणि पावलांच्या जागीं तेथून वर काढलेली पृथ्वी दिसली. पोटऱ्यांपाशीं मेरु, विंध्य, इत्यादि अनेक पर्वत आणि गुडघ्यांवर नाना प्रकारचे पक्षी त्याच्या नजरेस आले.

बलिराजाला त्या विराट पुरुषाच्या मांड्यांत हरएक जातींचे जनसमुदाय दिसले आणि जघनांवर बलीनें असुर पाहिले.

मान वर करून बलि पाहूं लागला तों त्या सर्वव्यापी बटूच्या बाहूंत बलीला दैवदैत्यांचे सहस्रावधि राजे दिसले. काखांमध्यें सप्तसागर आणि वक्षःस्थलावर त्याला नक्षत्रमाला आढळून आली.

त्याच्या हृदयावर बलीला धर्म दिसला. छातीच्या एका बाजूस सत्य आणि दुसऱ्या बाजूस ऋत दिसले.

त्याच्या कंठांत सामवेद आणि सारा शब्दसमूह होता.

त्या विश्वरूपाच्या कानांच्या ठिकाणीं सर्व दिशा, नाकाच्या जागीं प्राणवायु आणि मुखांत अग्नि व असंख्य ऋषिमुनि स्थित होते.

त्याच्या वाणींत वेद, जिव्हेवर वरुण, भुवयांच्या ठिकाणीं विधि व निषेध, पापण्यांवर दिवस व रात्र, कपाळावर क्रोध आणि ओंठांवर लोभ असल्याचें बलीला दिसून आलें.

त्या विश्वरुपाच्या केसांच्या जागीं घनदाट मेघ पसरलेले होते.

हे सर्व दृश्य पाहून भांबावलेल्या बलीनें आतां बटूच्या त्या विशाल अशा मस्तकाकडे पाहिलें. तेव्हां तेथें षोडशकलांनीं युक्त असा चंद्रमा त्याच्या नजरेस आला.

तो शीतळ चंद्रमा पाहून त्याचें गोंधळलेलें मन कांहींसें ताळ्यावर येत आहे तोंच बलीचें लक्ष त्या विराट पुरुषाच्या डोळ्यांकडे गेलें.

इतक्यांत सहस्रावधि सूर्यांच्या तेजालाही मागें टाकील असें प्रखर तेज तेथून एकाएकीं बाहेर पडलें! त्या तेजानें दिपून जाऊन बलीला मूर्च्छा आली.

मंचकावरून तो खालींच पडणार, पण बाजूला उभ्या असलेल्या विंध्यावलीनें लगेच त्याला सावरून तेथेंच मंचकावर निजविलें आणि आपल्या मांडीवर त्याचें डोकें घेऊन ती झारींतील पाणी त्याच्या डोळ्यांना लावून त्याला सावध करूं लागली.

बलीची ही अवस्था पाहून वामनानें आपला विराट देह हळूहळू आकुंचित करून पुन्हा आपलें पूर्वीचें गोंडस बटुरूप धारण केलें.

ह्या समयीं ब्रह्मदेव, सप्तर्षि आणि सनकादि मुनि हे सारे आपापल्या स्थानीं बसले होते. वामनाच्या अघटित कृतीमुळें त्यांचीं स्थानें गदगदां हाललीं आणि काय झालें म्हणून पाहाण्यासाठीं ते त्वरेनें बलिराजाच्या महालांत आले.

### १४. ‘आतां भिक्षेची जरुरी नाहीं’

राजा हळूहळू सावध झाला. समोर बटूची गोंडस मूर्ति उभी होती. ती पाहून त्याला हायसें झालें. थोडीशी हुशारी वाटतांच तो सावकाश बोलूं लागला. त्याच्या वाणींत आतां मार्दव होतें.

बटूकडे शून्य दृष्टीनें पाहात तो म्हणाला, ‘‘माझ्यासारखे शेकडों राजे तुझ्या पोटांत गडप झाले आहेत. तिथें माझी खिसगणती नाहीं. कसली माझी सत्ता आणि कुठला माझा दानशूरपणा? मी कशाचा अभिमान धरूं?’’

मग बटूच्या पावलांकडे नजर टाकीत तो म्हणाला, ''बटो, अवघ्या दोनच पावलांनीं सारं विश्व व्यापून टाकलंस. तुझं तिसरं पाऊल ठेवायला आतां माझ्या मस्तकाखेरीज दुसरी जागा तरी कुठें आहे? तर बटो, ठेव, आपलं तिसरे पाऊल माझ्या ह्या मस्तकावर ठेव आणि मला वचनमुक्त कर.''

असें काकुळतीनें म्हणत बलिराजा बटूच्या समोर जमिनीवर गुडघे टेंकून बसला आणि दोन्ही हात जोडून त्यानें आपलें मस्तक बटूपुढें वांकविलें.

बलीचें मस्तक खालीं झालेलें पाहून तेथें असलेले ब्रह्मदेव आणि ऋषिमुनि आश्चर्य करीत आहेत तोंच बटूच्या जागीं आतां शंख, चक्र, गदा व पद्म हातीं असलेला सुहास्यवदन विष्णु त्यांना उभा दिसला.

त्यांनीं भगवंताला नमस्कार केला. भगवंताची ती प्रशान्त मूर्ति नजरेस पडतांच विंध्यावलीच्या हृदयांत अननुभूत अशी एक संवेदना होऊन तिला भगवंताबद्दल एकाएकीं आत्मीयता वाटूं लागली.

तिनें अत्यंत आदरानें भगवंताच्या पायांवर मस्तक ठेवलें आणि ती म्हणाली, ''भगवंता, तूंच बटु असून विराटही आहेस. तूंच साऱ्या विश्वाचा कर्ताहर्ता असून ह्या विश्वाच्या बुडाशीं तूंच स्थित आहेस. तुझ्याच सत्तेनें अवघं विश्व चाललं आहे. असं असतां आम्ही दैत्य केवळ अहंकारापायीं तुला जुमानीत नाहीं. देह म्हणजेच सर्वस्व असं मानून त्याच्यापलीकडे काहींच नाहीं असं म्हणतों आणि त्यादेहाचीच पूजा करतों.

''भगवंता, वास्तविक पाहातां त्या देहांतही तूं आहेसच. पण मदांधतेमुळें आम्हां दैत्यांना तें दिसत नाहीं.

''भगवंता, आज हें विराट स्वरूप दाखवून तूं आमचे डोळे उघडले आहेस. माझा, माझा, असं म्हणून ज्या देहाचं आम्ही एवढं स्तोम माजवतों, तो आमचा देह म्हणजे तुझ्या त्या विराट स्वरूपांत कःपदार्थ आहे. अफाट सागरांतील वाळूच्या एका कणाएवढी देखील त्याची लायकी नाहीं.''

असें म्हणून विंध्यावलीनें पुन्हा आपलें मस्तक भगवंताच्या पायांवर ठेवलें आणि मग ती बलिराजाकडे शोधक नजरेनें पाहूं लागली.

भगवंताची ती सुहास्यवदन आणि प्रशान्त मूर्ति पाहून बलिराजाचाही धीर आतां चेपला होता. विंध्यावलीचें भाषण त्यानें अत्यंत विचारपूर्वक ऐकून घेतलें होतें. त्याची प्रतिक्रिया त्याच्या मनावर स्पष्टपणें व्यक्त झालेली दिसत होती.

विंध्यावलीच्या भाषणानें त्याचे डोळे आतां पुरते उघडले होते.

आपली सत्तेची धुंदी आणि दानशूरत्वाचा अभिमान विश्वरुपदर्शनामुळें जरी नाहींसा झाला असला तरी देहाबद्दलचा आपला अहंकार अजून कायमच आहे. त्या अहंकारापायींच आपली मत्ता म्हणून आपण आपलें मस्तक तिसरें पाऊल ठेवण्यासाठीं बटूच्या पुढें केलें आहे ह्याची त्याला आतां जाणीव झाली आणि अत्यंत हळुवारपणानें तो भगवंताला हात जोडीत म्हणाला, ''भगवंता, माझं मस्तक, माझा देह, मी, माझं, हा अहंभावदेखील तुझ्यापुढें व्यर्थ आहे. तुझी चेतना त्यांत नसेल तर त्या देहाचं एखाद्या मातीच्या मडक्याएवढंही मोल नाहीं. कशाला मी ह्या देहाची पूजा करीत आहें? भगवंता, माझा हा अहंकारही नष्ट झाला पाहिजे.''

असें म्हणून बाजूला मंचकावर पडलेला राजमुकुट बलीनें हातीं घेतला आणि तो भगवंताच्या पायांशीं ठेवीत तो त्याला आर्जवपूर्वक म्हणाला, ''परमेश्वरा, आतां तूंच आपल्या ह्या राज्याची हवी ती वाट लाव. माझ्यांत अजूनही शिल्लक असलेला अहंकार घालवण्यासाठीं मी आतां विंध्याचलावर तपश्चर्येला जातों. भगवंता, माझ्यावर तुझा वरदहस्त असूं दे.''

असें म्हणून बलीनें भगवंताला साष्टांग नमस्कार घातला.

तेव्हां बलीकडे वात्सल्यपूर्ण नजरेनें पाहात, भगवंतानें आपल्या हातांनीं त्याला वर उठवून मंचकावर बसविलें आणि तो राजमुकुट त्याच्या मस्तकावर ठेवला.

भगवंताचा करस्पर्श होतांच बलीच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले.

भगवंतानें त्याच्याकडे पाहून स्मित केलें आणि त्याला म्हटलें, ''राजा, जू अजून तरुण आहेस. तपश्चर्येला जाण्याचे तुझं हें वय नव्हे. तर तूंच आपलं राज्य सांभाळ.''

भगवंताचें हें औदार्य पाहून विंध्यावलीला गहिंवर येऊन तिच्या डोळ्यांवाटे आनंदाश्रु वाहूं लागले.

भगवंत बलीला पुढें म्हणाला, ''राजा, अहंकार घालवण्यासाठीं तपश्चर्येला जाण्याची गरज नाहीं. अरे, मानवाच्या ठायीं तो आपपरभाव अथवा भेदबुद्धि जन्मतःच निर्माण झालेली असते, तीच ह्या अहंकाराचं मूळ आहे. अहंकार घालवणं असेल, तर त्या मुळावरच घाव घातला पाहिजे. राजा,त्यासाठीं सर्व प्राणिमात्रांबद्दल मनांत आदर आणि मैत्रभाव बाळगून आपल्याप्रमाणेंच त्यांच्याही सुखासाठीं झटत राहा, महणजे तुझ्या हृदयांत एकात्मतेची भावना निर्माण होऊन भेदबुद्धि आपोआपच लय पावेल. आणि राजा, भेदबुद्धि लोपल्यावर मग अहंकार कुठला?''

असें म्हणत असतां भगवंतानें राजाकडे तसेंच विंध्यावलीकडेही कृपादृष्टीनें पाहिलें आणि, ''राजा, विंध्यावली, तुमचं कल्याण असो.'' असें म्हणून भगवान विष्णु तिथल्या तेथेंच अंतर्धान पावला आणि त्याच्या जागीं वामनाची बटुमूर्ति पुन्हा दिसूं लागली.

सर्वजण त्या बटुमूर्तीकडे आश्चर्यानें पाहूं लागले.

वामन स्मित करीत राजाला म्हणाला, ''राजा, तुझं हृदयपरिवर्तन झालेलं पाहून मी संतुष्ट झालों आहें. आतां मला भिक्षेची जरुरी नाहीं. तुझं कल्याण असो.''

असें म्हणून वामन लगेच मागे फिरला आणि धिम्मीं पावलें टाकीत महालाबाहेर गेला.

ब्रह्मदेव, ऋषिमुनि, बलिराजा आणि विंध्यावली तो दृष्टिआड होईपर्यंत चित्राप्रमाणें तटस्थ होऊन त्याच्याकडे पाहात राहिलीं.

नंतर विंध्यावलीनें सुवर्णकलशांतून गंगोदक आणल्यावर बलिराजानें ब्रह्मदेव आणि ऋषिमुनि ह्या सर्वांची पाद्यपूजा केली. तेव्हां सर्वांनी त्या दांपत्याला शुभाशीर्वाद दिले.

बलिराजाच्या राज्यांत माजलेल्या भोगसक्तीला आतां आळा पडून देहपूजा बंद होईल असा भरंवसा वाटून मग ब्रह्मदेव आणि ते ऋषिमुनि प्रमुदित अंतःकरणानें आपआपल्या स्थानीं परत गेले.

(पृष्ठ १३ वर)

**'स्यमंतक पर्व' - छंद ग्रांथिक ओवी**

दास हरीचा गाई चरिता उंच उभारुन बाहो
भावनात या भिजल्या गीता रसिकांनो परिसा हो
कीर्ती हरिच्या लीलांची जगी गाजली
कथा दासाने मण्याची येथे मांडली ॥धृ ॥

द्वारकेत होता एक सुशील सामंत
सत्राजित म्हणती त्याला फार तो श्रीमंत
त्याने सूर्यदेवतेची पूजा बांधली ॥१॥

सत्राजिताच्या भक्तीने सूर्य हो प्रसन्न
स्यमंतक मणी जो देई सोने भार दोन
ऐसी दिव्य भेट सामंताला दीधली ॥ २ ॥

ऐकुनी मण्याची कीर्ती राजा वसुदेव
मागतो मण्याला जाई सामंताचा ठाव
आज्ञा सामंताने त्याची नाही मानली ॥ ३॥

बंधु असे सामंताचा शिकारी प्रसेन
घेउनी मण्यासी जवळी करीतसे रान
तेथे सिंहाने त्यावरी उडी मारली ॥ ४ ॥

सत्राजित घेत वधाचा हरीवरी आळ
वदे मणी दे परतोनी राजधर्म पाळ
मण्या शोधण्या हरीने आण घेतली ॥ ५ ॥

वनामधे श्रीकृष्णाला शोधताच फार
दिसे केसरीला केले असे कुणी ठार
खूण पावलांची गुहेमाजी संपली ॥ ६ ॥

दिसे गुहेमाजी करता हरीने प्रवेश
ऋक्षराज जांबुवान मानवाचा वेश
मल्ल युद्धाचीच त्याने संधी साधली ॥ ७ ॥

जांबुवाना युद्धामाजी केले पराजीत
ओळखता अवताराला ऋक्ष सद्गदीत
कन्या आपुली हरीला त्याने अर्पिली ॥८ ॥

घेउनी वधूसी कृष्ण द्वारकेस येत
सोपवितो सत्राजिता मणी सुरक्षीत
तेव्हा सामंताची मान लज्जे वाकली ॥९ ॥

म्हणे सत्राजित कैसे होऊ उतराई
श्रीहरीस सांगे कन्या पदरात घेई
माला भामेने हरीला तेव्हा घातली ॥१०॥

एके दिवशी हस्तिनापुराहून एक दूत तातडीचा संदेश घेऊन आला. कृष्णाला तो म्हणाला, ''महाराज, धृतराष्ट्र महाराजांना आपल्याला कळवताना अत्यंत दुःखं होतंय की आपली आत्या कुंती आणि तिची पाच मुलं यांचं वारणावतात आकस्मिक निधन झालंय.''

हादरून कृष्णानं विचारलं, ''कशामुळं?''

दूतानं सांगितलं, ''त्यांचा वाडा रात्री अचानक लागलेल्या आगीत जळून खाक झाला. ती आग एवढी भयानक होती की पांडव स्वतःचं आणि मातेचं रक्षण करू शकले नाहीत. दुसऱ्या दिवशी सकाळी सहा मानवी शरिरांच्या अस्थीच काय त्या मिळू शकल्या.''

सुन्न झालेल्या कृष्णानं तातडीनं बलरामासहीत हस्तिनापुरास प्रस्थान केलं. हस्तिनापुरी त्यांनी धृतराष्ट्र, दुर्योधनादी त्याचे शंभर पुत्र आणि राजकुलातल्या इतर प्रतिष्ठितांच्या भेटी घेतल्या, त्यांचं सांत्वन केलं. पण हे सारं करत असताना त्यांच्या तीक्ष्ण नजरेतून काही गोष्टी सुटल्या नाहीत. कौरवांचा शोक उसना वाटत होता. सर्व नगरभर लोकांची कमिजास्त हलक्या

आवाजात कुजबूज चालू होती. याहीपेक्षा मोठं आश्चर्य म्हणजे पांडवांचा हितचिंतक विदूर याचा मुखवटा जरी दुःखाचा असला तरी चेहरा शांत वाटत होता!

शेवटी कृष्ण विदुराला एकांतात पण सरळच विचारता झाला, ''विदुरा, पांडव अजूनही जिवंत आहेत अशी माझी मनोदेवता मला सांगत्येय. इतकंच नव्हे तर हे कोडं आपणच सोडवू शकाल असंही मला वाटतंय! माझा अंदाज बरोबर आहे ना?''

यावर अतिशय लीनभावानं हात जोडून विदुर म्हणाला, ''प्रभू, आपण त्रिकालज्ञानी आहात. आपणास माहिती नाही अशी एकही गोष्ट त्रिभुवनात नव्हती, नाही आणि नसेल! परंतु पांडवांच्या अस्तित्वाविषयीची माहिती माझ्या तोंडून ऐकावी अशीच जर आपली योजना असेल तर मी आनंदानं तसं करायला तयार आहे. मात्र माझी एक विनंती आहे. ही गुप्त बातमी आपण आणि बलरामांनी माझ्या अंतर्गृहात बसून ऐकावी. त्या निमित्तानं आपले चरणकमल माझ्या वाड्याला लागतील. आपण जाणताच की माझ्याप्रमाणेच माझी अर्धांगीही आपल्या दर्शनाला परमोत्सुक आहे. आम्ही उभयता जमेल तसं आपलं आदरातिथ्य करायला अतिशय अधीर आहोत.''

किंचित् स्मित करून कृष्ण म्हणाला, ''तथास्तु!...''

**'देव भावाचा भुकेला' - छंद अभंग**

विदुर कृष्णाला आपुलिया घरी
आमंत्रण करी अगत्याचे ॥ १॥

वासुदेव देई तात्काळ संमती
विदुरा सुमती आवडीने ॥ २ ॥

पती प्रमाणेच विदुराची भार्या
सदा हरीकार्या करीतसे ॥३॥

उजाडे अखेर भाग्याचा तो दिन
श्रीहरी दर्शन उभयता ॥४॥

पाहता कृष्णासी भावमग्न स्थिती
भान विसरती पतीपत्नी ॥५॥

बैसोनि जवळी पाहताती हरी
घेऊनिया करी फलाहार ॥६॥

विदुर पत्नीने सोलुनिया केळे
विश्वंभरा दिले साल त्याचे ॥७ ॥

जाणोनी भावासी केला आनंदाने
स्वीकार हरीने लगोलग ॥८॥

नाही केला कोठे ऐसा रूचकर
गोड फलाहार हरी म्हणे ॥९ ॥

पाहता मुरारी अती समाधानी
आसवे नयनी येती त्यांच्या ॥१०॥

निरागस भक्ती विदुराच्या घरी
सेवोनि श्रीहरी तृप्त होई ॥११॥

**भाग ४ . योगेश्वर**

भारावलेल्या विदुरानं बलराम आणि कृष्णाला आपल्या अंतःपुराच्या एकांतवासात सांगितलं, ''ज्या वाडयात पांडव निवास करत होते तो दुर्योधनानं मुद्दाम लाखेनं बांधवला होता. हे कळल्यापासूनच माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकत होती. म्हणूनच पांडवांना मी त्या वाडयाखालून एक भुयारी मार्ग तयार ठेवण्याची सूचना दिली. चहुबाजूंनी एकदम आग लागताच कुंतीसह ते सारे बंधू भुयारी मार्गानं लागलीच एका सुरक्षित स्थळी रवाना झाले. योगायोगानं त्याच रात्री एक भिल्ल स्त्री आपल्या पाच मुलांसह

वाड्याच्या आश्रयाला येऊन राहिली होती. त्यांना या मार्गाची कल्पना नसल्यानं ती बिचारी मात्र आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.''

दरम्यान बलराम आणि कृष्ण द्वारकेत नसल्याची संधी साधून शतधन्वा नामक एका भोजकुलीन सामंतानं सत्यभामेचा पिता सत्राजीत याचा वध केला. याचं कारण असं होतं. सत्यभामेविषयी शतधन्वाच्या मनात लोभ उत्पन्न झाला होता आणि सत्राजीताकडे त्यानं तसं बोलुनही दाखवलं होतं. पण त्याला डावलून सत्राजीतानं सत्यभामेचा विवाह कृष्णाशी केल्यानंच शतधन्वानं हे कृत्य केलं. वडिलांचं निधन होताच सत्यभामेच्या शोकाला पारावार राहिला नाही. तिनं कृष्णाला शतधन्व्यास योग्य शासन करण्याची विनंती केली. कृष्णानं काशीपर्यंत त्याचा पाठलाग करून खड्गानं त्याचं मस्तक धडावेगळं केलं आणि सत्यभामेचं समाधान केलं.

असाच एके दिवशी सकाळी कृष्ण नित्यकर्मांत गढला असताना त्याच्याकडे इंद्राचा दूत आला. कृष्णाला अभिवादन करून तो म्हणाला, ''महाराज, देवेंद्रांनी आपल्याजवळ मदतीची याचना करण्यासाठी मला पाठवलंय.''

उत्सुकतेनं कृष्णानं विचारलं, ''मी देवाधिदेव इंद्रांची काय सेवा करावी अशी त्यांची इच्छा आहे?''

दूत म्हणाला, ''भगवन्, प्राग्ज्योतिष प्रदेशाचा उन्मत्त राजा नरकासुर यानं देवमाता अदितीची कुंडलं हरण करण्याचा दंडनीय अपराध केलाय. आपण ती कुंडलं परत मिळवून दयावीत अशी देवेंद्रांची इच्छा आहे.''

''ठीक आहे,'' कृष्णानं आश्वासन दिलं, ''देवमातेची कुंडलं नरकासुराकडून लवकरच परत मिळवून मी स्वतः देवेंद्रांकडे अमरावतीस घेऊन येईन...''

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

(पृष्ठ क्र.१० वरून..**वामनाची गोष्ट**)

मग बलिराजाही लौकरच आपल्या राजधानीस परत गेला.

विश्वरूपदर्शनामुळें त्याचें मन आतां व्यापक बनलें होतं. मनाची संकुचितता नाहींशी झाल्यानें स्वार्थबुद्धि ओसरुं लागली होती.

त्यामुळें त्याच्या आचरणांत साहजिकच आमूलाग्र बदल झाला.

राजाचाच आदर्श प्रजेपुढें असल्यानें, लोकांच्याही स्वार्थबुद्धीवर नियंत्रण पडून, त्यांना त्यागाच्या शिकवणीचें महत्त्व पटूं लागलें आणि ती शिकवण देणाऱ्या वेदांबद्दल त्यांच्या मनांत आदर व कुतूहल निर्माण झालें.

त्यामुळें त्यांचीं मुलें वेदाध्ययनासाठीं ऋषींच्या आश्रमांत पुन्हा जाऊं लागलीं आणि मध्यंतरीं ओस पडलेले आश्रम लवकरच छात्रगणांनी गजबजून गेले. (समाप्त)

**कै. गुंडोपंत हरिभक्त**

●●●

ज्येष्ठांच्या सर्व समस्यांचे मूळ शोधू गेल्यास बहुतेक वेळेला ते त्यांच्या आरोग्यातच दडलेले आहे असे आढळून येईल. मोठा आजार झाल्यास आर्थिक नियोजन कोलमडून पडते. रोगग्रस्त वृद्ध घरात असल्यास त्याचा कोणाला आधार वाटणे दूरच, अडगळच नाही तर संकट वाटते. ''बाईल म्हणे खरे। मरता तरी बरे। नासिले हे घर। थुंकोनिया ॥'' या शब्दात संतवर्य श्री तुकाराम महाराजांनी या स्थितीचे यथार्थ वर्णन केले आहे. रोगी ज्येष्ठांना घरात पडून राहावे लागत असल्यामुळे एकटेपणा अपरिहार्य होतो. एवंच ''प्रौढत्वी निज शैशवास जपणे'' म्हणजे लहान मुलांसारख्या उड्या मारणे नसून त्या उड्या मारण्याकरिता जी टुणटुणीत शारिरिक व मानसिक प्रकृती होती ती जपणे.

आरोग्य ही साधना आहे. त्यामुळे ती आयुष्यभर करायची असते. तरुणपणाचा काळ ज्यांनी सर्व तऱ्हेची कुपथ्ये करुन घालविला असेल त्यांनी म्हातारपणात निरोगी जीवनाची फारशी आशा धरुं नये. उदा. वाढलेल्या वजनावर आतडेकापून इलाज होऊ शकतो पण मग उर्वरित आयुष्यात परत कधीहि पोटभर जेवण घेता येत नाही. इतरहि सर्व आधिव्याधि यांचे तसेच आहे म्हणून लहानपणापासूनच आईवडिलांनी मुलांना आरोग्यवर्धक सवयी लावणे उत्तम. एकदा चांगली सवय लागली की ती अंगवळणी पडते. "Habit is second nature." अशा मंडळींना वृद्धापणात विशेष काळजी घ्यायची गरज पडत नाही. आरोग्य हा त्यांच्या अस्तित्वाचा भाग बनून जातो. अशा व्यक्तींना या लेखाचा उपयोग नाही. ज्यांनी सर्व तऱ्हेची कुपथ्ये केली त्यांनापण या लेखाचा उपयोग नाही. कारण त्यांचा कारभार वृद्धत्व येण्यापूर्वीच आटोपलेला असेल. ज्यांनी प्रकृतीची विशेष काळजी घेतली नसेल किंवा फार हेळसांड केली नसेल अशा म्हणजे बहुसंख्य ज्येष्ठांना या लेखाचा फायदा होऊ शकतो. होऊ शकतो म्हणण्याचे कारण हे की आयुष्याची साठ वर्ष जे केले नाही ते करायचे म्हणजे जरा कठिणच.

ज्येष्ठांची दोन वर्गात विभागणी होते सेवानिवृत्त व इतर. इतरांच्या दैनंदिन जीवनात वय झाले तरी फरक पडत नाही. पण निवृत्तांना एकदम अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. सर्वात महत्वाची समस्या वेळ घालविण्याची. या समस्येच्या उदरात अनारोग्याचा जन्म होतो. अशा व्यक्तींचा पहिला हल्लाबोल स्वयंपाक घरातून होतो. डब्यात भाजी होती की उसळ, पोळी की भाकरी याकडे लक्ष न देणाऱ्या व्यक्तीला कालवण मिळमिळीत असल्याचा एकदम साक्षात्कार होतो. घरात बऱ्याच दिवसात भजी झाली नाहीत याची आठवण होते. शेजारच्या राघवन अम्मांकडे होतात तशा लुसलुशीत इडल्या आपल्या घरी का बनत नाहीत असा प्रश्न पडतो. (अम्मांना पुरणपोळी किंवा मसालेभात का येत नाही हे विचारण्यात अर्थ नसतो.) जीभ वारा प्यालेल्या वासरासारखी चौखूर उधळते. घरातले सगळे डबे धुंडाळले जातात. कोणत्या डब्यात काय आहे

याची माहिती गृहिणीपेक्षा घरच्या आजोबांना जास्त चांगली असते. दिवसभर काहीतरी तोंडात टाकायला लागते. ''खाऊन बोलणे अन् बोलून ते चघळणे'' अशी स्थिती होते. पोट म्हणते, 'जरा घेऊ द्या नं रजा, माझा वाजला की बाजा, पण माणूस ऐकायला तयार नसतो. शेवटी जिभेमुळे पोट, अन पोटामुळे सर्व शरीर व्याधिग्रस्त होते. म्हणून ज्येष्ठांनी (वास्तविक सर्वांनीच) पाळावयाचा पहिला नियम म्हणजे ''जिभेला लगाम घालणे''. भूक लागेल तेव्हाच हितकारक अन्न मोजक्या प्रमाणात खाणे हाच आरोग्याचा मूलमंत्र आहे.

जिभेला लगाम घालणे यात खाण्याबरोबरच अनावश्यक बोचरी, कुचकट वटवट पण आली. लोकांना अनाहूत सल्ले देणे, आत्मप्रौढी वगैरे उद्योगांमुळे व्यक्तीची समाजातील प्रत कमी होते. लोक अशा व्यक्तीला टाळू लागतात. त्या व्यक्तीच्या एकटेपणात भर पडते व त्याचा मानसिक व पर्यायाने शारिरिक आरोग्यावर परिणाम होतो कारण शरीर व मन यांचे निकटचे नाते आहे.

वृद्धापकाळात आरोग्याकरिता शारिरिक व्यायाम अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय शरीराचे चलनवलन, चयापचय वगैरे नीट होऊ शकत नाहीत. व्यायाम म्हणजे जिममध्ये जाणे नव्हे. जोरबैठका पण नाहीत. चालण्याचा, शक्यतर झपझप चालण्याचा व्यायाम उत्तम. योगासने, दीर्घश्वसन वगैरेपण फार उपयुक्त. शरीराच्या प्रत्येक भागाला आळोखे पिळोखे दिल्यास स्नायू कार्यक्षम राहतात. (Twist Therapy). शवासन फारच हितावह. जाणकर व्यक्तींकडून या गोष्टी शिकून घ्याव्या.

शारिरिक आरोग्याबरोबर मनाचे आरोग्यपण तितकेच महत्वाचे आहे. मानसिक आरोग्य टिकविण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे मनाला कोणत्यातरी चांगल्या कामात गुंतवून ठेवणे. स्वस्थ बसणे हा मनाचा स्वभाव नाही हे ओळखून त्याप्रमाणे आपल्या दिनचर्येची आखणी करावी. ज्याची देवावर श्रद्धा असेल त्याने आपल्या इष्टदेवतेशी स्वतःला बांधून घ्यावे. त्या देवतेची पूजा, अर्चा, जप, ध्यान यात मनाला गुंतवून ठेवावे. आपल्या दुःखाचे रडगाणे इतर कोणापुढे गाण्यापेक्षा आपल्या इष्ट देवतेपुढे गाणे केव्हांहि चांगले. त्याने मनाला शांति मिळेल. जे नास्तिक असतील त्यांनी तत्वज्ञ सॉक्रटिसप्रमाणे स्वतःशी व आपल्या तत्वांशी प्रामाणिक राहावे. आस्तिकता, नास्तिकता ह्या आंतरिक भावना आहेत, प्रदर्शनाच्या गोष्टी नाहीत. त्यामुळे त्याबाबतीत कोणाशी वितंडवाद घालत बसू नये. ''तुटे वाद संवाद तो हितकारी'' हे श्रीसमर्थ रामदास स्वामींचे वचन लक्षात ठेवावे. परमेश्वराविषयी वाद म्हणजे "Ignorance agruing with ignorance, resulting in more ignorance"

भक्ती हा मनःशांतीचा प्रशस्त मार्ग असला तरी आपण दिवसभर हरि हरि करत बसू शकत नाही. म्हणून प्रत्येक वृद्ध व्यक्तीला काहीतरी छंद हा हवाच. त्यात मन गुंतून राहाणे, वेळ चांगला जाणे यांच्या व्यतिरिक्त निर्मितीचा आनंद हा बोनस मिळतो. बहुतेकांना आपल्या पूर्वायुष्यांत कामाच्या व्यापामुळे आपल्या आवडत्या गोष्टी करणे जमत नाही व तो सल मनाला बोचत राहतो. वृद्धापकाळ ही त्यावर इलाज म्हणून ईश्वराने दिलेली पर्वणी समजून

आपल्या सुप्त आकांक्षांची अवश्य पूर्ती करता येईल. या बाबतीत ज्येष्ठ नागरिक संघात सामिल झाल्यास अंगातल्या सुप्त गुणांना वाव मिळेल. आमच्या ''अंतरंग ज्येष्ठ नागरिक सामाजिक संस्थेने'' अशा अनेक झाकल्या माणकांना, छुप्या रुस्तुमांना व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्यामुळे आज कितीतरी ज्येष्ठांना गायन, वादन, कथाकथन, मैदानी खेळ वगैरेतले स्वतःचे नैपुण्य इतरांसमोर सादर करायची संधी मिळाली. त्यामुळे प्रत्येक कार्यक्रमानंतर मंडळी प्रसन्न मनाने घरी जातात. नंतर हि कार्यक्रमांच्या नियोजनाच्या व सरावाच्या निमित्ताने आनंदाची देवाण घेवाण करतात. आनंदाचे डोही डुबक्या मारतात. शरीर व मन निरोगी राखतात.

आरोग्याचा विचार करताना अपघात प्रवण परिस्थिती टाळणे पण महत्वाचे. गर्दीची ठिकाणे, गर्दीच्या वेळेस लोकलमधून प्रवास करणे इत्यादि गोष्टींपासून शक्य तितके दूर राहायला हवे. सांडलेले पाणी, वीज, गॅस याबाबत कमालीची दक्षता घ्यावी.

सर्व तऱ्हेची काळजी घेऊनसुद्धा माणसाला रोगराई वगैरेंचा त्रास होतोच. आईवडिलांकडून मिळालेला जनुकीय वारसा, दूषित हवा, पाणी, अन्न, कामानिमित्त घालावे लागणारे हेलपाटे, रोगाच्या साथी वगैरे अनेक घटक त्याला कारणीभूत असतात ज्यावर व्यक्तीचे काहीचे नियंत्रण नसते. अशावेळेस ''प्रारब्धकर्मणाम् भोगात् एव क्षयः।'' असा विचार केल्यास आजारपणात जी चिडचिड होते तिच्यापासून मुक्ती मिळेल.

आरोग्याचा विचार करताना अखेरच्या क्षणाचा विचारपण करायला हवा. तो कसा येईल हे जरी आपणाला माहित नसले तरी इच्छापत्र (मृत्युपत्र) देहदानाची तयारी वगैरे करुन ठेवल्यास ''त्यागात् शांतिः अनन्तरम्।'' या भगवतीतेतल्या ह्या उक्तीनुसार (गीतेला जरी कर्मफलत्याग अभिप्रेत असला तरी हे वचन सर्व तऱ्हेच्या त्यागाला लागू पडते) अखेरच्या क्षणी जगाला समाधानाने टाटा करता येईल. जर दुर्दैवाने त्याक्षणी आपण कोमात गेलेले असू तर डझनभर सुया खुपसून, नळ्या लावून कृत्रिम साधनांनी शरीर जीवित ठेवण्याचा प्रयत्न करु नये अशी निक्षून ताकीद आधीच सर्वांना देऊन ठेवलेली बरी. शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार मृत्युसमयी रक्तात वाढलेल्या कार्बन डायऑक्साईडमुळे जीवाला सुखाची अनुभूती येत असते. मग आपण तो आनंद का हिरावून घ्यावा?

**- भा. द. भांड**
रो हाऊस नंबर आठ,
फ्लॉवर व्हॅली कॉम्प्लेक्स,
पूर्व द्रुतगती मार्गालगत,
ठाणे (प.) - ४०० ६०१.
भ्रमणध्वनी : ९९२०१७३१६५

[ सभासद - अंतरंग ज्येष्ठ नागरिक सामाजिक संस्था, कोलबाड, ठाणे (प.)]

(व्यास प्रतिष्ठान तर्फे आयोजित निबंध स्पर्धेतला प्रथम क्रमांकाचा लेख-संपादक)

●●●

## मरणोत्तर जीवन आणि पुनर्जन्म सिद्धांत (उत्तरार्ध)

प्र. सि. मराठे

एप्रिल २०१६ च्या अंकात आलेल्या याच शीर्षकाच्या लेखाचा हा उत्तरार्ध जुलै २०१६ च्या अंकात देत आहोत -संपादक

दररोजच्या व्यवहारात घडणाऱ्या घटनांना कार्यकारणभाव व तर्कशास्त्राच्या कसोट्या लावून पुनर्जन्म सिद्धांत कसा सिद्ध होतो, किंवा व्यवहारात पहाण्यात येणाऱ्या काही अद्‌भुत घटनांची कारणमीमांसा आपण केवळ पुनर्जन्म सिद्धांताच्या गृहित तत्त्वांच्या आधारे कशी करु शकतो व त्यामुळे तो सिद्धांत अप्रत्यक्षपणे कसा सिद्ध होतो हे आपण या लेखाच्या पूर्वार्धात पाहिले. आता वेदान्तात म्हणजे निरनिराळ्या उपनिषदात व सर्व उपनिषदांचे जणू नवनीत अशा, प्रत्यक्ष भगवन्ताच्या मुखातून निघालेल्या भगवद्‌गीतेत या विषयावर काय अधिकृत माहिती मिळते ते या 'उत्तरार्धात' पाहू.

### भाग २

जगातील इतर सर्व धर्मसंस्थापकांनी आपण केवळ परमेश्वराचे प्रेषित आहोत या भूमिकेतून धर्मोपदेश केला आहे. भारतीय अध्यात्मशास्त्र व तत्त्वज्ञान यांचा मूळ आधार असलेली उपनिषदे निरनिराळ्या ऋषींच्या नावांनी प्रसिद्ध आहेत. पण त्या तत्त्ववेत्त्यांची भूमिकाही आपणास आत्मज्ञान (म्हणजे ब्रह्मज्ञान) झाले आहे एवढीच होती. परंतु या सर्व उपनिषदांचे जणू 'नवनीत' अशी गीता सांगताना, श्रीकृष्णांनी मीच पुरुषोत्तम परमेश्वर अशी भूमिका घेतली होती आणि त्यावर अर्जुनाचा विश्वास बसावा म्हणून त्याला आपले दिव्य विश्वरुप दाखविले होते म्हणून गीतेला इतर धर्म ग्रंथांपेक्षा अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. गीतेत सांगितलेले तत्त्वज्ञान काळालाही पुरुन उरले आहे, म्हणजेच हजारो वर्षांपूर्वी सांगितलेल्या गीतेंतील आशय (तत्त्वे) इतका काळ जाऊनही कालबाह्य झालेली नाहीत. आजपर्यंत हजारो तत्त्ववेत्त्यांनी आपले तत्त्वज्ञान सांगताना गीतेचाच आधार घेतलेला आहे. सनातन धर्मातून कित्येक धर्म-पंथ निघाले परंतु त्या धर्मपंथ संस्थापकांनी आपल्या प्रतिपादनाला गीतेचाच आधार कसा आहे हेच दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. गीतेची भाषांतरे जगातील सर्व भाषांमधून झाली आहेत. पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांनी सुद्धा गीतेचे अनन्यसाधारण महत्त्व मान्य केले आहे. हजारो वर्षे लोटली तरी कोणत्याही धर्मपंडिताने गीतेत सांगितलेल्या तत्त्वज्ञानाला कोणताही पर्याय सुचविलेला नाहीच, परंतु प्रत्येकाने आपण प्रतिपादन केलेल्या तत्त्वाचे मूळ गीतेत कसे आहे हेच दाखविण्यात धन्यता मानली आहे. आद्य शंकराचार्य किंवा ज्ञानेश्वर या लोकोत्तर दैवी पुरुषांनी, गीतेचाच अर्थ सामान्य लोकांस समजाऊन सांगण्यासाठी (गीतेवर) टीका लिहिल्या.

अशा या योगेश्वर परमेश्वराकडून सांगितल्या गेलेल्या गीतेत, 'मरणोत्तर जीवन व पुनर्जन्म सिद्धांत' या सांप्रतच्या विषयावर काही माहिती मिळते का ते आता पाहू.

'मरणोत्तर जीवन' हा विषय काही

भगवद्‌गीतेत मुख्य प्रतिपाद्य विषय नव्हता. धर्मसंमूढ अशा अर्जुनाला कर्मप्रवृत्त करुन युद्धप्रसंगी त्याचे धर्मकर्तव्य दाखवून देण्यासाठीच कृष्णाने अर्जुनाला गीतोपदेश केला. परंतु ज्ञान, कर्म, भक्ती वगैरे योगमार्गांचे विवरण करताना, निरनिराळ्या संदर्भात या विषयासंबंधी माहिती आली आहे. त्या सर्वांचे (आशयांचे) संकलन करुन व समन्वय साधून 'मृत्योत्तर जीवन व पुनर्जन्म' या विषयसंबंधात काय अधिकृत माहिती मिळते त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न आता करुया.

**भाग ३**

१) गीतेच्या दुसऱ्या अध्यायात (सांख्ययोग) अगदी सुरुवातीलाच आत्म्याच्या अमरत्व, सातत्य, अविनाशित्व व अव्यक्तत्वाबद्दल विवेचन आले आहे. त्याच्याप्रमाणे मृत्यूची व्याख्याच बदलते. एकादा मनुष्य मृत्यू पावला असे आपण म्हणतो तेव्हा वास्तवात तो आत्मा (मनुष्य) त्याचा देह सोडून गेल्यामुळे त्याचा देह मृत झालेला असतो असेच मृत्यूचे वर्णन करावे लागेल.

**न जायते म्रियते वा कदाचित नायं भूत्वा भविता वा न भूयः।**
**अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ।।२/२०**

**अच्छेद्यःअयं अदाह्यः अयं अक्लेद्यः अशोष्यः एवच।**
**नित्यः सर्वगतः स्थाणुः अचलोऽयं सनातनः।। २/२४**

**अव्यक्तः अयं अचिन्त्यःअयं अविकार्यः अयं उच्यते। २/२५** (पहिला चरण)

हा आत्मा कधी जन्मत नाही किंवा मरतही नाही. हा अज नित्य, शाश्वत व पुरातन आहे आणि शरीराचा वध झाला तरी तो मारला जात नाही. याला शस्त्रे तोडीत नाहीत, अग्नि जाळीत नाही तसेच याला पाणी भिजवू शकत नाही की वायू सुकवू शकत नाही.

हा आत्मा इंद्रियाना गोचर न होणारा, मनानेही जाणण्यास व कल्पना करण्यास अशक्य व ज्यास कोणत्याही विकाराची उपाधि होत नाही असा आहे. मागे चर्चिल्याप्रमाणे, वस्तूचे कोणतेही गुण त्याला नसल्यामुळे तो भौतिक शास्त्रांच्या कक्षेच्या पलीकडे जातो व म्हणून कोणत्याही इंद्रियानी किंवा भौतिक उपकरणानी त्याचे ज्ञान होणे अशक्य होते.

२) जन्ममरणाच्या फेऱ्याविषयी व देहान्तराविषयी खालील श्लोक संयुक्तिक आहेत.

**जातस्य हि ध्रुवो मृत्युः ध्रुवं जन्म मृतस्यच। तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ।। २/२७**

**देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा। तथा देहान्तरप्राप्तिः धीरस्तत्र न मुह्यति ।। २/१३**

ज्याचा जन्म झाला त्याचा मृत्यु अटळ आहे आणि ज्याचा मृत्यु झाला त्याचा पुन्हा जन्म अपरिहार्य आहे त्याच्यापुढेही जाऊन भगवान कृष्ण सांगतात की 'देह धारण करणाऱ्यास या देहांत ज्याप्रमाणे बालपण, तरुणपण प्राप्त होते, त्याचप्रमाणे मृत्यू व जन्म यांच्या आधारे त्यास

दुसरा देह प्राप्त होत असतो, म्हणून ज्ञानी मनुष्य या बाबतीत मोह पावत नाही.' याप्रमाणे मृत्यू व पुनर्जन्म याना बाल्य, तारुण्य व वार्धक्य यांच्या पुनरावर्तित मालिकेतच बसविले आहे.

**वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोपरणि ।**
**तथा शरीराणी विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥ २/२२**

ज्याप्रमाणे एखादा मनुष्य जुनी वस्त्रे टाकून देऊन दुसरी नवी ग्रहण करतो, त्याप्रमाणे देही म्हणजे आत्मा जुनी शरीरें टाकून दुसरी नवी शरीरे धारण करतो.

भौतिक त्रिगुणांत गुरफटलेल्या माणसाला मृत्यु जरी भयंकर व आयुष्याचा शेवट करणारा वाटत असला तरी त्रिगुणरहित आत्म्याच्या दृष्टीने मृत्यू ही घटना आपण एक जुने वस्त्र टाकून नवे घालण्याइतकीच साधी व सामान्यआहे, असे येथे दाखविले आहे अणि म्हणूनच ज्ञानी माणसे मृत्यूला घाबरत नाहीत तर त्याचे स्वागतच करतात. उदाहरणार्थ :- आपण ज्याप्रमाणे विशेष समारंभासाठी मुद्दाम शिवलेला पोषाख घालतो व समारंभ संपल्यावर तो नवीन पोषाख काढून ठेवतो, तेवढयास सुलभतेने ज्ञानेश्वरानी आपले विशेष अवतारकार्य संपले आहे असे वाटल्यावर संजीवनी समाधी लावून देह सोडला.

३) गीतेच्या चवथ्या अध्यायाच्या सुरुवातीलाच कृष्ण अर्जुनाला सांगतो की मी पूर्वी जो योग विवस्वानाला, विवस्वानाने मनूला व पुढे मनूने इक्ष्वाकुला सांगीतला तोच 'योग' मी तुला आता (म्हणजे ३ ऱ्या अध्यायांत) सांगितला. तेव्हा अर्जुन आश्चर्याने विचारतो की विवस्वान् मनु वगैरे मंडळी हजारो वर्षापूर्वी होऊन गेली तेव्हा तुम्ही हा योग विवस्वानाला सांगणे कसे शक्य आहे? तेव्हा कृष्ण अर्जुनाला सांगतात.

**बहूति मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।**
**तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परन्तप ॥ ४/५**

माझे व तुझे पूर्वीच्या काळांत खूप जन्म होऊन गेले आहते. फरक इतकाच की तुला त्यांची स्मृती नाही व मी ते सर्व जाणतो. कृष्ण पुढे सांगतात

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ४/७**

**परित्राणाय साधूनां विनाशय च दुष्कृताम् ।**
**धर्मसस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ४/८**

याचा अर्थ काही विशिष्ठ परिस्थितीत पृथ्वीवर अधर्म माजला, असूरांचे राज्य झाले तर सज्जनांचे रक्षण व दुर्जनांचे दमन करुन पुन्हा धर्मव्यवस्था संस्थापित करण्यासाठी निर्गुण निराकार परमेश्वर सुद्धा सगुण देहरुपी अवतार घेऊन मृत्युलोकी जन्म घेतो.

४) सजीव सृष्टीमध्ये जीवांमध्ये चैतन्य कसे येते, त्या चैतन्याचे परमात्म्याशी काय नाते आहे व परमात्मा आपल्या सुक्ष्मांशाने जीवाची चयापचय क्रिया कशी चालवितो वगैरे विवरण १३ व्या व १५ व्या अध्यायांत आले आहे.

**ममैवांशो जीवलोके जीवभूतःसनातनः।**
**मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ १५/७**

**शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।**
**गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात् ॥ १५/८**

**श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेवच ।**
**अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥१५/९**

**उत्क्रामन्तं स्थितं वापि भुञ्जानं वा गुणान्वितम्।**
**विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः॥ १५/१०**

**यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मवस्थितम्**
**यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतसः॥१५/११**

माझाच (म्हणजे परमात्म्याचा) अंश प्रकृतिंतील मन व पांच इंन्द्रिये यांना ओढून घेऊन लिंग शरीर धारण करून जीवाच्या स्थूल शरीरात वास करतो व जीवाच्या मृत्यूसमयी या लिंगशरीराला बरोबर घेऊनच तो बाहेर पडतो. कान, डोळे, त्वचा, जीभ, नाक व मन यांच्याद्वारे हा जीवात्मा (लिंग देहासह) विषयाचा उपभोग घेत असतो.

असा हा जीवात्मा शरीरांत वास करताना व शरीरांतून निघून जाताना, साधारण माणसे पाहू शकत नाहीत. ज्ञानचक्षूंनी पहाणारे सिद्धपुरुषसुद्धा त्याला प्रयत्नानेच पाहू शकतात. योगी पुरुष आपल्या ठायी स्थित असलेल्या आत्म्याला प्रयत्नाने ओळखतात. परंतु ज्यांची बुद्धि त्रिगुणांतून अलिप्त होऊन स्थिर झालेली नाही ते प्रयत्न करून सुद्धा जीवात्म्याला ओळखू शकत नाहीत.

याचा अर्थ असा की आत्मा किंवा सर्व सजीव सृष्टीतील चेतना-तत्त्व हे भौतिक मूलतत्त्वांच्या (Physical elements) पलीकडील असल्यामुळेच ते पंचेंद्रिय मन व बुद्धि यांना आधुनिक उपकरणांच्या सहाय्याने सुद्धा गोचर होऊ शकत नाही.

परमेश्वरानेच निर्माण केलेल्या पर व अपर अशा दोन प्रकृती गीतेच्या सातव्या अध्यायात निराळ्या संदर्भात सांगितल्या आहेत.

**भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्दिरेव च।**
**अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ७/४**

**अपरे यमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्।**
**जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत्॥ ७/५**

पृथ्वी, पाणी, अग्नि, वायू, आकाश (ही पांच महाभूतें) मन बुद्धि अहंकार मिळून आठ प्रकारे विभागलेली ही माझी अपरा म्हणजे खालच्या प्रतीची 'प्रकृति' आहे, याशिवाय जिने या जगाचे धारण होते अशी 'परा' म्हणजे श्रेष्ठ प्रतीची माझी दुसरी 'प्रकृति' आहे. म्हणजेच सर्व सृष्टींतले (विश्वांतील) जीवतत्त्व (म्हणजेच आत्मा वा चेतना) हे 'परा' प्रकृतीचा भाग आहे आणि त्यामुळेच आत्मा अव्यक्त अचिन्त्य व अविकार्य आहे.

५) जन्म व मृत्यू यामधील अवकाश म्हणजचे आयुष्य ही एक कार्यशाळा आहे व त्यामध्ये आत्म्याला पंचेद्रिये मन व बुद्धी यांच्या सहाय्याने 'ज्ञान' विज्ञान व 'कला' अवगत करून योगमार्गाने आध्यात्मिक उन्नति करण्याची संधी मिळते. परंतु त्यासाठी त्यास बुद्धीच्या जोरावर पंचेन्द्रियांवर मनाचा संपूर्ण ताबा मिळवावा लागतो.

**मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये।**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः॥**
**७/३**

इंद्रियांचे संयमन करून योगसिद्धीचा प्रयत्न हजारांत एकादाच मनुष्य करतो व अशा कित्येक योग्यांमध्ये क्वचित् म्हणजे एकाद्यालाच सिद्धी प्राप्त होते. त्यामुळे योगमार्गावर प्रवास करणाऱ्यामध्ये इंन्द्रियांवरील ताबा सुटून सिद्धीपासून वंचित झालेल्यांचीच संख्या खूप असणार. तेव्हा योग सिद्धीच्या प्रवासात मध्येच योगभ्रष्ट झालेल्या योगयाची अवस्था काय होते? त्याने या आयुष्यात केलेला अभ्यास व कष्ट मोफतच जातात की काय? असा प्रश्न अर्जुन सहाव्या अध्यायांत अध्यात्मयोगाचे निरुपण ऐकल्यावर कृष्णाला करतो. तेव्हा कृष्ण त्याचे उत्तर देतो.

**पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते।**
**न हि कल्याण कृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति॥**
**६/४०**

**प्राप्य पुण्यकृतांल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः।**
**शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते॥**
**६/४१**

**अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्।**
**एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम्॥ ६/४२**

**तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम्।**
**यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन॥६/४३**

**पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः।**
**जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते॥**
**६/४४**

**प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः।**
**अनेक जन्म संसिद्धस्ततो याति परां गतिम्॥**
**६/४५**

कृष्णाने दिलेले उत्तर सत्प्रवृत्त माणसांना तसेच योगाभ्यास करणाऱ्यांना दिलासा देणारे आहे. तो म्हणतो अर्जुना येथे (म्हणजे या जन्मांत) केलेले कोणतेही सत्कृत्य व पुण्यकारक कर्म (यज्ञ दान तप) वा योगसाधना कधीच फुकट जात नाही. कल्याण कारक कर्मे करणाऱ्या पुरुषाला, इहलोकी काय आणि परलोकी काय कधीच दुर्गति प्राप्त होत नाही.

योगाभ्यासाची साधना अपूरी राहिलेले पुरुष स्वर्गादि परलोकांत आपल्या पुण्यकर्माचा उपभोग घेऊन पुन्हा पृथ्वीतलावर (म्हणजे मर्त्यलोकांत) शुचिर्भूत, श्रीमान किंवा बुद्धिमान योग्यांच्या कुळांतच जन्मतात की त्यांना योगाभ्यास करण्यास उत्तम वातावरण मिळेल. असा दुर्लभ जन्म योगाभ्यास करणाऱ्यानाच मिळू शकतो. असा जन्म घेतल्यावर पूर्वजन्मांतील बुद्धिसंस्कार त्याला अनायासेच प्राप्त होतो व तो आपला योगाभ्यास त्याच्यापुढे चालू करु शकतो. या नवीन जन्मात योगाभ्यासाची ओढ त्याला जन्मतचः प्राप्त होते व तो योगाभ्यासात जास्त प्रयत्नशील होतो. याप्रमाणे पुढील प्रत्येक जन्मांत, जास्त जास्त प्रगती होत होत अनेक जन्मानंतर योग्याला अखेर सिद्धी मिळते व तो मला पोहोचतो, (म्हणजे त्याला परंधाम प्राप्त होते) जेथे पोहोचल्यावर जन्म मरणाचा फेरा चुकतो. (पुन्हा मृत्युलोकांत परतावे लागत नाही)

मृत्युलोक ही कर्मभूमि किंवा एक प्रकारची कार्यशाळा आहे. जीवात्म्याला योगाभ्यास

करण्यास ज्ञान, विज्ञान व कला प्राप्त करण्यास व अध्यात्म मार्गात प्रगती करण्यास पृथ्वीवरच जन्म घ्यावा लागतो.

विद्यार्थ्याला ज्याप्रमाणे पदवी मिळविण्यापूर्वी शाळेत व विश्वविद्यालयात निरनिराळ्या इयत्तांतून शिकावे लागते, त्याप्रमाणेच जीवात्म्याला पूर्ण 'सिद्धी' मिळेपर्यंत अनेक जन्मांत योगाभ्यास करवा लागता. एका इयत्तेत उत्तम अभ्यास केल्यावर विद्यार्थी ज्याप्रमाणे पुढच्या वर्षी वरच्या इयत्तेत जातो त्याप्रमाणेच एका जन्मांत उत्तम (यज्ञ दान तप) कर्मे करणाऱ्यास पुढील जन्मी पूर्वजन्मी केलेल्या अभ्यासाच्या पुढील अभ्यास करण्याची संधी मिळते व तो पुढे आणखी प्रगति करु शकतो. नीट अभ्यास न करणारा विद्यार्थी ज्याप्रमाणे एकाच वर्गात रखडतो व त्यास अभ्यासक्रम पूरा करण्यास जास्त वर्षे लागतात, तद्वत् विषयांच्या मोहजाळात गुरफटल्यामुळे योगभ्रष्ट होणाऱ्या मानवास सिद्धि प्राप्त होण्यास जास्त जन्म घ्यावे लागतात. शाळेत किंवा विश्वविद्यालयांत अभ्यास करण्याऐवजी इतरच दुरुद्योग करुन दुर्वतन करणाऱ्यास ज्याप्रमाणे शाळेतून किंवा कॉलेजातून काढून टाकले जाते, (Rusticate) त्याप्रमाणे आसुरीवृत्ती धारण करुन पापकर्म करणारा मनुष्य योगमार्गावरुन पदच्युत होऊन त्याला दुर्गती प्राप्त होते म्हणजे त्याला खालच्या हीन योनीत जन्म घ्यावा लागतो.

६) आता एका जन्मानंतर व दुसरा जन्म घेण्यापूर्वी मधल्या अवस्थेंत जीवात्म्याची काय व्यवस्था होते याविषयी माहिती आपल्याला गीतेच्या नवव्या व आठव्या अध्यायात मिळते ती पाहू.

ज्ञान, विज्ञान, कला व अध्यात्मविद्येत एका जन्मात केलेली प्रगति किंवा प्राप्ति (Achievement) पुढील जन्मांत माणसास अनायासे प्राप्त होते व तो तेथून सुरुवात करून आणखी पुढे प्रगति करु शकतो हे आपण मागे पाहिले. परंतु याशिवाय मनुष्य आयुष्यांत जी पुण्य/ पाप कर्मे करतो त्यांचे काय होते हे खालील श्लोकांत सांगितले आहे.

**त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते।**
**ते पुण्यमासाद्य सुरेंन्द्रलोकमश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान् ॥ ९/२०**

**ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति।**
**एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभन्ते ॥ ९/२१**

जे स्वर्गप्राप्तीची इच्छा धरुन यज्ञ-दान-तप कर्मानी पुण्य संपादन करतात त्यांना मृत्यूनंतर इंद्रादि परलोक प्राप्त होतात व त्यांच्या पुण्यकर्मानुसार ते दिव्यसुख उपभोगतात व पुण्यसंचय संपल्यानंतर ते परत मर्त्य लोकांत परत येतात. याप्रमाणे उपभोगांची इच्छा धरुन पुण्यकर्म करणाऱ्या मानवाना स्वर्गाच्या येराझाऱ्या कराव्या लागतात. त्यांची जन्ममृत्यूच्या चक्रांतून सुटका होत नाही. निष्काम कर्मयोगाची साधना झाल्यासच परंधामाची प्राप्ति होऊ शकते व जन्ममृत्यू चक्रांतून सुटका होऊ शकते.

**यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥**
**१५/६** (दुसरा चरण)

परमेश्वर विश्वाचा पिता असून सर्व

विश्वाचा व्यवहार चालवतो व तो चालवण्यास त्याने मानवाची व्यवस्थापक म्हणून निरनिराळ्या स्तरावर नेमणूक केली आहे व त्याप्रमाणे देशकालाप्रमाणे व त्याला प्राप्त झालेल्या स्थितीप्रमाणे किंवा व्यवसायानुसार काही कर्तव्ये प्राप्त होतात हे आपण पूर्वी पाहिले आहे. ती कर्तव्ये निष्ठेने प्रामाणिकपणे व आपल्या कुवतीनुसार त्यातल्या त्यांत उत्तम रितीने पार पाडण्याची क्रिया अशी पुण्याची सर्वसाधारण व्याख्याकरिता येईल व त्याच्या विपरित कर्मासच पाप म्हणतात.

मागील भागांत निरनिराळ्या जन्मांना कार्यशाळेची व शाळेंतील इयत्तांची दिलेली उपमा आपण येथेही पुढे चालवू शकतो. ज्याप्रमाणे एका वर्गातील अभ्यासांत वार्षिक परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास पुढील वर्षाचा अभ्यासक्रम सुरु होण्यापूर्वी उन्हाळ्याच्या सुट्टीत शिक्षक व पालक त्याला बक्षीसे देऊन त्याचे लाड पुरवतात किंवा त्यांच्या आर्थिक क्षमतेप्रमाणे त्याला आवडत्या ठिकाणी सहलीला प्रेक्षणीय स्थळे पहाण्यास पाठवतात त्याप्रमाणेच दोन जन्मांच्या मध्यांतरामध्ये पुण्यसंचयाप्रमाणे मानवी आत्म्याला दिव्य परलोकांत दिव्य सुखोपभोग घेण्यास पाठविले जाते. परंतु पुढच्या वर्गाचे शिक्षण घेण्यास ज्याप्रमाणे विद्यार्थ्यास उन्हाळ्याची सुट्टी संपल्यावर शाळेत वरच्या वर्गात रुजू व्हावे लागते त्याप्रमाणे मानवी आत्म्याला परलोकवास संपवून अध्यात्मिक प्रगति करण्यासाठी पुन्हा मर्त्य लोकांत जन्म घ्यावा लागतो.

७) **आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन।**
**मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते।।**
**८/१६**

मृत्यूलोकापेक्षा वरच्या पातळीचे दिव्यतर असे निरनिराळ्या थराचे परलोक आहेत की जेथे पुण्यात्मे त्यांच्या लायकीप्रमाणे सुखोपभोग घेतात. सर्व दिव्य लोकांत ब्रह्मलोक श्रेष्ठ आहे. परंतु ब्रह्मदि परलोकांत जीवात्म्याचे कायम वास्तव्य होऊ शकत नाही, पुण्यसंचय संपल्यावर तिकडून मृत्युलोकांत रवानगी होतेच. भगवान कृष्ण पुढे सांगतात की जीवात्मा मला येऊन मिळतो म्हणजे ज्यावेळी त्याला योगसिद्धी प्राप्त होऊन खऱ्या अर्थाने आत्मज्ञान होते म्हणजे जीवात्मा व परमात्म्याचे एकरुप उमजून येते (Self Realization) त्यावेळीच त्याची जन्ममृत्यू चक्रांतून सुटका होते व ती स्थिती (ब्राह्मी स्थिती) प्राप्त होण्यास जीवात्म्याला त्याच्या कर्तृत्वाप्रमाणे कमी अधिक जन्मांतरांतून जावेच लागते.

८) आता मृत्युसमयी माणसाच्या मनांत जसे विचार असतात किंवा ज्या गोष्टींचे चिंतन तो करतो त्याप्रमाणे त्यास कशी गती प्राप्त होते ते गीतेच्या ८ व्या अध्यायांत सांगितले आहे. त्यांतील ३ मुख्य श्लोक असे -

**अन्तकालेच मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्।**
**यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः।।**
**८।५**

**यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम्।**
**तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः।।**
**८।६**

**तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च।**
**मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैषस्यसंशयम्।। ८।७**

मरणसमयी माणसाचे मनात जे विचार असतील किंवा ज्या गोष्टीवर त्याचे चित्त स्थिर असेल त्याप्रमाणे त्याला गति प्राप्त होते. अन्तकाली देह सोडताना जो माझे (म्हणजे परमात्म्याचे) स्मरण करतो तो मलाच प्राप्त होतो म्हणजे ब्रह्मीभूत होतो व त्याला परंधाम प्राप्त होते. त्याचप्रमाणे जो मनुष्य ज्या देवतेची उपासना आयुष्यभर करतो त्याच देवतेचा विचार मृत्यूसमयी त्याच्या मनात येतो व तो मरणांतरी त्याच देवतेप्रत जातो.

परंतु ज्यांनी कोणतीच साधना केली नाही जे नेहमी भौतिक विषय भोगांतच गुरफटून राहिलेले असतात त्यांचे मन मृत्यूसमयीही त्या विषयांच्या विचारांतच रमत असल्याने त्यांची अधोगति होऊन त्या वासना तृप्त करण्याच्या ईच्छेने त्यांना मृत्यूलोकांत पण खालच्या पातळीवर जन्म घ्यावा लागतो.

अंतःकाळी जर माझे स्मरण व्हावयाचे असेल तर त्यासाठी आयुष्यभर नेहमी माझे स्मरण करतच तूं (युद्धकर) कर्मे केली पाहिजेत. परिस्थितीशी झगडताना मन व बुद्धि मला अर्पण करून मीच नेमलेले काम तू करत आहेस असे समजून निष्ठेने कर्मे केलीस तर मृत्यूसमयीही माझेच स्मरण तुला आपोआपच होऊन तूं मलाच येऊन मिळशील यांत बिलकूल संशय नाही.

**भाग-४**

वरीलप्रमाणे गीतेमध्ये निरनिराळ्या स्थळीं अप्रत्यक्षपणे आलेल्या संदर्भांच्या आधारे आपण पुनर्जन्माच्या म्हणजेच जन्मजन्मांतरी होणाऱ्या आत्मिक उन्नतीच्या सिद्धांताची सांगोपांग जुळणी करु शकतो.

मागील भागांत दिलेल्या गीतेतल्या संदर्भावरुन वरील सिद्धांताची मुख्य उपतत्त्वे खालील प्रमाणे काढता येतील.

१) आत्मा अमर आहे. तो जन्मत नाही की मरत नाही. तो सनातन आहे. मृत्यूसमयी (शरीर वा) देह नष्ट झाला तरी देही म्हणजे आत्मा मरत नाही.

२) आत्मा हा भौतिक पदार्थ वा वस्तूंपासून अतीत आहे. म्हणून तो पंचेन्द्रियानां किंवा शास्त्रीय उपकारणांना सुद्धा गोचर होत नाही. म्हणजे तो अव्यक्त आहे. त्याची मनाने किंवा बुद्धीनेही कल्पना करता येत नाही म्हणजे तो अचिंत्य आहे. कोणत्याही बाह्य शक्तींना त्याला बदलता येत नाही म्हणजे तो 'अविकार्य' पण आहे.

३) जीवात्मा हा परमेश्वराचाच सनातन अंश असून तो लिंगशरीर धारण करून जीवाच्या स्थूल शरीरांत वास करतो व मरणसमयी लिंगशरीराला बरोबर घेऊनच तो देहाच्या बाहेर पडते.

४) हा अव्यक्त व अचिंत्य जीवात्मा सिद्ध पुरुषांना केवळ अतिन्द्रिय दृष्टीनेच प्रयत्नाने दिसू शकतो.

५) 'मृत्यूलोक' ही जीवात्म्यांना आध्यात्मिक उन्नति करुन घेण्यासाठी उघडलेली एक प्रकारची कार्यशाळाच आहे. एका जन्मांत केलेला योगाभ्यास किंवा आध्यात्मिक प्रगती किंवा कल्याणकारक कर्मे फुकट न जाता पुढील जन्मांत जीवात्म्याला ती जन्मतःच प्राप्त होतात व तो तिथपासूनच पुढे आणखी प्रगति करु शकतो.

६) ह्या विश्वाचा व्यवहार चालविण्यासाठी

परमेश्वर जीवात्म्याला जन्मतःच नियत कर्मे ठरवून देतो व त्याच्या पूर्वजन्मींच्या कर्तृत्वाप्रमाणे व उरलेल्या अतृप्त वासनांप्रमाणेच योग्य ठिकाणी त्याला जन्म देतो.

७) देशकालाप्रमाणे आपल्यावर पडलेली कर्तव्ये, ती परमेश्वरानेच नेमून दिली आहेत या निष्ठेने प्रामाणिकपणे जास्तीत जास्त चांगल्या रीतीने करणे हे पुण्यकर्म तर त्या विपरित कर्म हे पाप कर्म ठरते. हीच पुण्यकर्मे निष्काम बुद्धिने केली तर ती कर्मयोग साधना होते व त्यामुळे मोक्षमार्गामध्ये आत्म्याची प्रगति होते.

८) एका जन्मांत केलेल्या पुण्यकर्मांची अनभूक्त फले भोगण्यासाठी मृत्यूनंतर जीवात्मा त्याच्या पुण्याईच्या प्रतीप्रमाणे निरनिराळ्या स्तरांवरील परलोकांत वास्तव्य करून सुखोपभोग घेतो व पुण्यसंचय संपल्यावर पुन्हा मृत्यूलोकांत जन्म घेतो. परलोकात संचित पुण्याचा क्षय होतो परंतु तेथे नवीन पुण्य वा पाप जोडता येत नाही. ज्याप्रमाणे वर्षभर बचत केलेले पैसे घेऊन आपण सहलीला निघाला की, पैशाच्या जोरावर हॉटेलमध्ये राहून मौजमजा करतो परंतु ही मजा उपभोगत असतानां आपण आणखी पैसे कमावत नसतो. त्यामुळे पदरचे पैसे संपले की आपणांस आपल्या रहात्या ठिकाणी परत यावेच लागते.

पुण्यकर्म जोडण्यास व आध्यात्मिक प्रगती करण्यास आपणास मृत्यूलोकांतच जन्म घ्यावा लागतो कारण मृत्यूलोकच कार्यशाळा किंवा कर्मभूमि आहे.

९) वर्तमान जन्मांत केलेल्या बऱ्यावाईट कर्मांची फले जीवात्मा भोगत असतानांच पूर्वजन्मांतील कर्मांची अनभूक्त फलेही (बरीवाईट) त्यास अनुभवास येतात. ज्यांचा वर्तमान जन्मांतील कर्माशी सुसंवाद दिसत नाही, त्यालाच आपण दैव किंवा नशीबाचा हात म्हणतो.

१०) फलाशा धरुन केलेल्या पुण्यकर्मानी यज्ञ (त्याग)-दान-तप पुण्य गाठीस लागले तरी त्यानी आत्मज्ञान होण्यास लागणारी योगसाधना होत नाही. अशा पुण्याईमुळे काही काळ परलोकांत सुखोपभोग मिळाला तरी त्याने जन्ममृत्यूच्या फेऱ्या चुकत नाहीत.

ज्ञानमूलक, भक्तिप्रधान, निष्काम वृत्तीने केलेल्या नियत कर्मांनीच योगसाधना होऊन मोक्षमार्गावर जीवात्म्याची प्रगति होत रहाते व जन्मजन्मांतरी अशी प्रगति होत होत ज्यावेळी योगसिद्धि होते. त्यावेळीच त्याला परंधाम प्राप्त होऊन तो जीवात्मा जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होतो.

११) ज्यावेळी पृथ्वीवर धर्माचा ऱ्हास होऊन अधर्म बळावतो, लोकांमध्ये दैववृत्तीचा लोप होऊन आसुरीवृत्ती फैलावते, त्यावेळी परमेश्वर त्याच्याजवळ वास करत असलेल्या मुक्तात्म्यांना पुन्हा धर्मव्यवस्था रुढ करण्यासाठी प्रेषित किंवा अवतारी पुरुषांच्या रुपांत पृथ्वीवर पाठवतो.

**भाग ५**

परमेश्वराच्या विश्व व्यवहार चालविण्यासाठी योजलेल्या शासन व्यवस्थेचे वरील नियम म्हणजेच पुनर्जन्माचा सिद्धांत सामान्य माणसास मोठाच दिलासा देणारा, सत्कर्म करण्यास प्रवृत्त करणारा व त्याचे मरणाचे भय घालविणारा असा आहे.

व्यवहारामध्ये बरेच वेळा आपणास सत्प्रवृत्त लोक कष्टमय जीवन जगताना दिसतात तर आसूरप्रवृत्तीची माणसे (सकृत् दृष्ट्या) मौजमजा करताना दिसतात. अशा प्रसंगी बऱ्याचवेळा माणसाचा सत्त्यावरील व ईश्वराच्या न्यायबुद्धिविषयी विश्वास डळमळीत होतो. खूप प्रयत्न करून सुद्धा काही लोकांना यश मिळत नाही, तर काहींच्या आयुष्यात इतके मोठे चढउतार होतात किंवा आयुष्याला कलाटणी देणाऱ्या अशा काही अपघाती घटना घडतात की अशी माणसे अत्यंत निराशावादी जीवन जगतात किंवा टोकाचे दैववादी बनून पूर्ण निष्क्रिय बनतात.

समाजाच्या खालच्या थरांत किंवा अत्यंत गरीब कुटुंबात जन्म झाल्यामुळे काही माणसांच्यामध्ये मानसिक न्यूनगंड पैदा होतो व त्यांच्यापेक्षा चांगल्या परिस्थितीत जन्मलेल्या माणसांबद्दल त्यांच्या मनांत असूया व द्वेषाची भावना निर्माण होते.

वरीलप्रमाणे व्यवहारांत दिसणाऱ्या विरोधाभासांचे पुनर्जन्मसिद्धांताने संपूर्ण निरसन कसे होते हे मागील भागांत आलेले आहे. म्हणून या सिद्धांताचे ज्ञान झाल्यावर वर सांगितलेल्या माणसांत निर्माण होणाऱ्या मानसिक विकृतीही पार नाहीशा होतात.

कामक्रोध मोहांच्या आहारी जाऊन मनुष्य पापकर्म करण्यास कितीही प्रवृत्त झाला तरी परमेश्वराचाच अंश असलेला त्याचा जीवात्मा त्याला अशा पापकर्मापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत असतोच. माणसांतील 'आसूरी वृत्ति' जेवढी प्रबल असेल त्या प्रमाणांत हा आतला आवाज दुर्बल किंवा फिका होतो व माणूस त्याची दखलसुद्धा घेत नाही. परंतु अशा पापकर्म करून मिळविलेल्या संपत्तीचा उपभोग घेत असताना पश्चातापाच्या भावनेने त्याची मानसिक शांति नाहीशी होते. त्यामुळे वरवर पहाणाऱ्याला असा मनुष्य मौजमजा करता दिसला तरी अन्तर्यामी मनःशान्ती ढळल्यामुळे त्याला निर्मळ आनंदाला मुकावे लागतेच पण त्याबरोबर त्याला मानसिक वेदनाही भोगाव्या लागतात.

अमेरिकेसारख्या सर्वसमृद्ध देशांत स्वैर जीवन व सर्व तऱ्हेच्या सुखोपभोगाची रेलचेल असून सुद्धा मानसिक तोल गेलेल्या माणसांचे प्रमाण खूप जास्त असण्याचे कारणही हेच आहे आणि म्हणूनच सर्व सुखोपभोगांत बुडलेले पण मानसिक शांतीला वंचित आलेले लोक असली किंवा नकली गुरुंच्या भोवती गर्दी करताना दिसतात व त्याचा फायदा घेण्यास भोंदू लोकांना चांगली संधी मिळते.

ईश्वराच्या या शासन व्यवस्थेत माणसाने केलेल्या प्रत्येक बऱ्यावाईट कर्माची प्रतिक्रिया किंवा परिणाम माणसास तत्काल, याच जन्मांत, काही काळानंतर किंवा पुढील जन्मांत भोगावेच लागतात. या जन्मांत दुसऱ्याकडून घेतलेले पण न फेडलेले उपकार किंवा कर्ज या जन्मांत नाही तर पुढील जन्मांत जीवात्म्यास फेडावेच लागतात. आपण काही अडचणींत वा संकटांत असताना व आपल्या सगेसोयरानीं मदत करण्यास नकार दिला असताना किंवा आपला मित्र परिवार त्यावेळी उपलब्ध नसताना आपण ज्यास पूर्वी कधी पाहिलेलेही नाही, असा मनुष्य आपल्याकडून कसलीही अपेक्षा न करता आपल्याला मदत करण्यास देवदूतासारखा उभा

रहातो असा अनुभव बऱ्याच वेळा येतो. हे कशामुळे होत असावे? पूर्वजन्मी आपण केलेले व त्याने न फेडलेले उपकार या जन्मी फेडण्यासाठीच तो अतःप्रेरणेने म्हणजे ईश्वराच्या प्रेरणेनेच आपल्याला मदत करण्यास धावून येतो व कोणतीही अपेक्षा न करता, आपल्या डोक्यावरचे कर्जाचे ओझेच हलके झाल्याच्या भावनेने निघूनही जातो. आपण याला ईश्वरी कृपा किंवा दैवयोग म्हणतो. पण अशी घटना आपण पूर्वजन्मांत केलेल्या चांगल्या कर्माचे फळच असते. त्याचप्रमाणे एकादे वेळी आपली काहीच चूक नसताना आपल्याला अपघात होतो किंवा भयंकर आर्थिक नुकसान होते या विरोधाभासाचे निरसनही आपणास वरील उपतत्त्वाद्वारेच मिळू शकते.

आपल्या देहांत वास करणारा अव्यक्त अचिंत्य असा जीवात्मा हा परमेश्वराचा अंश म्हणजे त्याचा प्रतिनिधीच असून तो आपल्याला अतःप्रेरणेने सन्मार्गावर राखण्याचा प्रयत्न करीत असतो या उपतत्त्वाची माणसास जाण झाली की, त्याच्या वृत्तींत फरक होऊन तो जीवात्म्याकडून होणाऱ्या अंतःस्थ सूचनांची दखल घेऊ लागतो व त्यामुळे काममोहांनी दाखविलेल्या प्रलोभनांनी विचलित न होता सन्मार्गावर रहाण्याचा प्रयत्न करतो व देशकाल व परिस्थितीप्रमाणे अंगावर पडलेली कर्तव्ये ही परमेश्वरानेच नेमून दिलेली कामे आहेत असे समजून तो ती निष्ठेने व भक्तियुक्त अंतःकरणाने पार पाडण्याची पराकाष्ठा करतो. अशा रीतीने त्याच्याकडून नेहमी पुण्यकर्मच होत राहिल्यामुळे त्याला पश्चातापाची पाळी कधीच येत नाही. त्याला कर्तव्य पालनाचे एक प्रकारचे दिव्य समाधान मिळून योग्य फलप्राप्ति झाली नाही तरी निराशा त्याला कधीच ग्रासत नाही. अशा रीतीने या जन्मीचा अभ्यासक्रम उत्तमप्रकारे पार केल्यानंतर मृत्यूनंतर तो खचितच वरच्या वर्गात जन्म घेतो. त्यामुळे अशा माणसाला मृत्यूची भीति अशी कधीच वाटत नाही.

वार्षिक परीक्षेची भीति कोणाला? ज्याने वर्षभर नेमलेल्या पाठ्यक्रमाचा अभ्यास न करता उनाडक्या करण्यात वेळ गमावला असेल त्याला. परंतु ज्याने वर्षभर नियमित अभ्यास करून पाठ्यक्रमांत प्राविण्य मिळविले असेल तो परीक्षेला धैर्याने तोंड देतो कारण परीक्षेनंतर वरच्या वर्गात जाण्याची त्याला खात्री असले.

या प्रमाणे आपल्या भारतीय सनातन धर्मामध्ये हजारो वर्षांपासून मान्यता पावलेला हा पुनर्जन्मसिद्धांत मनुष्यास सत्कर्मप्रवृत्त करून आत्मज्ञान होण्यास मदत करणारा, मृत्यूची भीती घालविणारा व कोणतेही केलेले कल्याणकारी कर्म कधीच मोफत जात नाही असा दिलासा देऊन मनुष्यास प्रयत्नवादी करणारा आहे.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

•••

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

आदर्श लोकशाहीच्या या इंग्लंडमध्येच राणीचीही 'ओळख' आहे. राणीचे वाढदिवस साजरे होतात असेच नाही तर लोकप्रतिनिधींनाही राणी संबोधित करते. राणी असली तरी तिचे 'साम्राज्य' इंग्लंडवरती नाही. लोकशाहीने निवडून दिलेले लोकप्रतिनिधीच इंग्लंडचा राज्यकारभार चालवतात. राजघराण्याला 'सैद्धान्तिक' विरोध असणारे राजकीय पक्ष आणि त्यांचे प्रतिनिधीही लोकसभेत आणि लोकसभेबाहेर राणीच्या अस्तित्वाचा संयमित आदर करतात. एकाधिकारशाही आणि लोकशाहीमधला हा फरक आहे. लोकशाहीमध्ये 'विरोधही' सन्मानाने मान्य केला जातो, आणि तो 'सभ्य' समाजचौकटीमध्येच व्यक्त केला जातो.

भारत ही जगातली एक सर्वात मोठी लोकशाही. लोकशाहीत 'सत्ते'पेक्षा 'प्रतिनिधीत्व' अपेक्षित असते. दुर्दैवाने भारतीय लोकशाहीत संख्याबळावर निवडून आल्यावर, 'प्रतिनिधीत्व' संपते आणि 'सत्ता' सुरू होते. भारत गणराज्य (Republic) झाल्यावर 'घराणेशाही' म्हणजे 'राजेशाही' तत्त्वतः खालसा झाली. तरीही गेल्या ६० वर्षांत लोकशाहीच्या माध्यमातून एकाच पक्षांत नाही, तर कमी अधिक प्रमाणांत सर्वच राष्ट्रीय आणि प्रांतीय पक्षांमध्ये 'घराणेशाही' किंवा 'व्यक्तिकेंद्रीत' राज्यकारभार चालू झाला. दुर्दैवाने 'सुबुद्ध' नागरिक बळापेक्षा, 'संख्याबळ' हाच तिचा आधार झाला.

१९४७ साली भारत भौगोलिकदृष्ट्या स्वतंत्र झाला. पण प्रशासन ते शिक्षणापर्यंत असलेल्या 'सांस्कृतिक' वसाहतवादापासून मात्र 'स्वातंत्र्य' तो आजही मिळवू शकलेला नाही. १५०० वर्षांहून अधिक काळ आक्रमकांशी लढण्यात गेल्यावर हा बदल एका रात्रीत घडेल अशी अपेक्षा कोणाचीच नाही. ज्या भारताने जगाला चांगली प्रमाण भाषा दिली (पाणिनी), राज्यशास्त्र दिले (कौटिल्य), तत्त्वज्ञान, आणि वादविवादाची साधनं दिली (आस्तिक आणि नास्तिक दर्शने), त्या भारताला आजही आपली सांस्कृतिक 'ओळख' का शोधावी लागते, हा एक संशोधनाचाच विषय आहे.

'इंग्रज' आणि 'युरोपियन' धर्मप्रसारकांच्या कार्यपद्धतीमध्ये कदाचित याची उत्तरे मिळू शकतील.

८ व्या शतकापासून १५ व्या शतकापर्यंत, 'इस्लामी' आणि 'पोर्तुगीज' आक्रमकांचा भर हा 'युद्ध', 'बळजबरी' आणि 'जुलूम' यावरच होता. १६ व्या शतकाच्या पुढे मात्र, इंग्लंड आणि युरोपमधून जे 'धर्मप्रसारक' आले, विशेषतः दक्षिण भारतामध्ये, त्यांची धर्मप्रचाराची कार्यपद्धती संपूर्णतः भिन्न होती. हाच काळ युरोपमध्ये 'प्रबोधनकाळ'(Renaissance) म्हणून ओळखला जातो. चर्च आणि ख्रिस्ती धर्माची उलट तपासणी याच वेळेस सुरू झाली. युरोपमध्ये प्रबोधनकाळ म्हणजे, त्यांच्या संस्कृतीचा जो मूळ 'स्रोत' ग्रीक संस्कृती, तिच्या तत्त्वज्ञान आणि सांस्कृतिक मूल्यांचा पुनःस्वीकार करणे. वसाहतवादानंतर भारतामध्ये 'प्रबोधन' काळ म्हणजे, आपल्या मूळ संस्कृतीच्या स्रोतांना टाकून देऊन, आधुनिकतेच्या नावाने संस्कृतीचे पाश्चातीकरण स्वीकारण्यात आले.

भारताप्रमाणेच हळूहळू अफ्रिका आणि

दक्षिण अमेरिकेवरही युरोपियन राष्ट्र आणि त्या पाठोपाठ ख्रिस्ती धर्मप्रसारकांचे आक्रमण चालू झाले. १६ व्या शतकाच्या सुरुवातीला मार्टीन ल्यूथर (Martin Luther, 1483-1546) यांनी रोमन चर्चच्या सत्तेविरूद्ध बंड पुकारून, अनेक सुधारणांचा आग्रह धरला, आणि यातूनच ख्रिस्ती धर्मामध्ये 'प्रोटेस्टंट' पंथ उदयाला आला. भारतामध्ये, विशेषतः दक्षिण भारतामध्ये, 'प्रोटेस्टंट' आणि त्याच्या जवळच्या इतर शाखांचा प्रभाव जास्त असला, तरी पश्चिम आणि मध्य भारतामध्ये मात्र जेझुईट (Jesuit-Society of Jesus) पंथाचे धर्मप्रसारक मोठ्या प्रमाणावर कार्यरत होते.

अफ्रिका किंवा दक्षिण अमेरिकन देश आणि भारत यामध्ये एक फार मोठा 'सांस्कृतिक' फरक होता. भारत हा 'तत्त्वज्ञान' ते 'भाषे'पासून 'कला', 'स्थापत्य' इ. सर्वच क्षेत्रामध्ये आपले 'वेगळे' सांस्कृतिक अस्तित्त्व राखून होता. आपल्या व्यतिरिक्त उर्वरीत सगळे जग हे 'रानटी' आहे अशी ठाम समजूत असलेल्या धर्मप्रसारकांना हा फार मोठा धक्का होता. शुद्ध 'बळजबरी' किंवा 'प्रलोभनांनी' धर्मप्रसार करणे इथे शक्य नाही हे त्यांच्या लक्षात आले.

इथेच 'धर्मप्रसारा'च्या साधनांमध्ये 'मूलभूत' फरक झाला.

ज्या समाजामध्ये धर्मप्रसार करायचा, त्या समाजाची 'भाषा' आणि 'संस्कृती'च्या अभ्यासाचा उगम हा त्यातून झाला. प्रचंड 'चिकाटी', 'मेहनत', 'निरिक्षण शक्ती', आणि 'गुणग्राहकते'च्या आधारावर या धर्मप्रसारकांनी आपली भाषा आणि संस्कृतीचा जो अभ्यास केला, त्याला जगात तोड नाही. या अभ्यासातूनच, 'तुलना' व त्यावर आधारित 'भेदनीती', आणि त्याची परिणिती म्हणजे 'ख्रिस्ती'धर्माचे आणि 'पाश्चात्य' विज्ञानाचे श्रेष्ठत्व, याक्रमाने हा संस्कृतीच्या वसाहतवादाचा प्रवास सुरू झाला.

ख्रिस्ती धर्मीयांकरता, 'विश्वरचने'पासून मानवी व्यवहारांच्या सर्व 'मार्गदर्शक संस्थां'चा उगम म्हणजे 'बायबल'. हे बायबल प्रांतीय भाषांमध्ये भाषांतर करण्याकरता, त्या त्या प्रांतांच्या भाषांचा अभ्यास धर्मप्रसारकांनी सुरू केला. हा प्रयत्न नुसत्या 'रूपांतरांचा' नव्हता, तर बायबलमधील मूळ वचनांचा 'आशय' व्यक्त करू शकेल अशा भाषांतराचा होता. भाषांतर करताना बायबलच्या वचनांचा तसूभरही विपर्यास होणार नाही याकरता हा प्रयत्न होता. धर्मप्रसारकांच्या ते लक्षात आले की, भारतामध्ये प्रांतांमधून 'बोलीभाषा' अनेक असल्या, तरी 'बिनचूक' आशय व्यक्त करील, अशा प्रमाण भाषा मात्र त्या नव्हत्या. साहजिकच ही बाब त्यांच्या लक्षात आल्यावर आणि 'भाषा' ही संस्कृती वहनाचे काम करते हे त्यांना माहीत असल्यामुळेच, भाषेच्या त्यांच्या अभ्यासाचा पाया 'व्यापक' व्हायला लागला.

१८०० साली कलकत्ता येथे 'फोर्ट विल्यम' हे कॉलेज ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासकीय नोकरांना भाषा, आणि त्यामधून संस्कृती शिकवण्याकरता चालू झाले. प्रांतीय भाषांची 'आशय' व्यक्त करण्याची क्षमता सीमित असली, तरी दक्षिणेपासून उत्तरेपर्यंतच्या धर्मप्रसारकांना दुसरा मोठा धक्का बसला तो

म्हणजे, एका अत्यंत विकसित प्रमाण भाषा, 'संस्कृत'च्या अस्तित्त्वाचा. त्याहीपेक्षा मोठा धक्का होता तो म्हणजे, दक्षिणेपासून उत्तरेपर्यंतच्या सर्व पंडितांना ही भाषा सहज अवगत होती. हळूहळू या भाषेमधील तत्त्वज्ञानापासून, कलेपर्यंतच्या प्रचंड साहित्याचीही धर्मप्रसारकांना कल्पना येऊ लागली. त्यांच्या सहज लक्षात आले की, त्यांना जो आशय व्यक्त करायचा होता तो संस्कृतमधून सहजरित्या व्यक्त करणे शक्य आहे.

सर विल्यम जोन्स यांनी १७८५ ला कलकत्त्यालाच 'एशियाटीक सोसायटी'ची स्थापना केली. त्यांनी 'संस्कृत', 'ग्रीक' आणि 'लॅटीन' भाषांमधील 'साधर्म्य' जगाला दाखवून दिल्यामुळे, भाषाशास्त्राच्या अभ्यासालाच एक नवीन कलाटणी मिळाली. 'तौलनिक' आणि 'ऐतिहासिक' भाषाशास्त्र हे पुढे त्यातून विकसित झाले. त्यामुळे साहजिकच संस्कृत मधील साहित्याच्या अभ्यासाची तीव्र उत्सुकता संपूर्ण पाश्चात्य जगतामध्ये निर्माण झाली, आणि संस्कृतमधील सर्व ग्रंथांचा सखोल अभ्यास 'धर्मप्रसारक' आणि 'संशोधकां'नी चालू केला. १७९० ते १८१० या २० वर्षांच्या काळात ५ संस्कृत व्याकरणांची पुस्तके लिहिण्यात आली.

1. 1790 - Paulinus of St. Bartholomew
2. 1804 - William Carey
3. 1805 - H. T. Colebrook
4. 1808 - Charles Wilkins
5. 1810 - H. P. Forster

संस्कृतचा त्यांचा हा अभ्यास आजही सुरू आहे.

संस्कृतवर ताबा घेतल्यावर धर्मप्रसारकांनी प्रांतीय भाषांच्या अभ्यासाला सुरुवात केली. Henrique Henriques, Balthazar da Costa, Philippus Baldaeus, and Bartholomew Ziegenbalg या सर्वांनी पोर्तुगीज आणि लॅटीनमधून तामिळचे व्याकरण लिहिले. यातूनच त्यांनी तामिळ 'गद्य' आणि 'पद्य' साहित्याचा विकास करायला सुरुवात केली. प्रत्येक शब्दांच्या सांस्कृतिक छटांचा कुठेही विपर्यास होणार नाही याचा कसोशिने प्रयत्न केला. हे सर्व प्रयत्न बायबलचे तामिळमध्ये मूळ आशयासकट भाषांतर करण्याकरिताच होते. हे करत असतानाच तामिळ संस्कृतीच्या सर्व अंगांचा, तिथल्या 'शेती'पासून, 'वैद्यक' आणि 'स्थापत्य'शास्त्राचा अभ्यासही त्यांनी सुरू केला.

इकडे बंगालमध्ये John Zephaniah Holwell (1711-1798), Alexander Dow (1739-1779), Nathaniel Brassey Halhed (1751-1830), Charls Wilkins (1749-1836), आणि William Jones (1746-1794) यांचा हिंदू धर्म आणि संस्कृत भाषेचा अभ्यास चालूच होता. William Carey (1761-1834) हा स्कॉटीश धर्मप्रसारक, कलकत्त्याच्या 'फोर्ट विल्यम' कॉलेजमध्ये 'संस्कृत', 'मराठी' आणि 'बंगाली'चा प्राध्यापक म्हणून रुजू झाला. १८०१ मध्ये त्यानी बंगाली भाषेचे व्याकरण लिहिले तर, १८०५ मध्ये त्यांनी मराठीचे व्याकरण लिहिले. कॅरे भारतीय विज्ञान आणि शेतीचाही अभ्यास करायला लागला. Roxburgh या साहेबानी वनस्पती शास्त्राचा अभ्यास करून Hortus Bengalensis हा ग्रंथ लिहिला. कॅरेची त्याला

१२ पानांची अभ्यासू प्रस्तावना आहे. Roxburgh यांनी २ खंडांमध्ये Flora Indica हे भारतीय वनस्पतींवर पुस्तकही लिहिले आहे. १८३३ साली कॅरे 'ॲग्रिकल्चरल सोसायटी ऑफ इंडिया'चे अध्यक्ष झाले. रामायणाचे भाषांतर करायलाही त्यांनी सुरुवात केली होती. अर्थात त्यांचा हा प्रकल्प पुरा होऊ शकला नाही.

हा भाषा आणि संस्कृतीचा एवढा व्यापक अभ्यास बिनचूक बायबलच्या भाषांतराकरता. १८३४ साली कॅरे यांचा मृत्यू झाला. तेंव्हा बायबलची अनेक भाषांतरे आणि न्यू टेस्टामेंटची २३ भाषांतरे झाली होती.

कॅरे यांनी १८०५ मध्ये व्याकरण लिहून मराठी भाषेला प्रमाणभाषा करण्याचा जो प्रयत्न चालू केला तो महाराष्ट्रामध्ये इतर ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी त्याच उत्साहाने पुढे नेला. कँडी या साहेबांनी मराठीला 'विरामचिन्हे' दिली. मराठीचे प्रमाणीकरण आणि त्याच्या व्याकरण शुद्धतेबद्दल तो आग्रही होता. अर्थातच हा सगळा प्रयत्न भारतीयांना ख्रिस्ती बनवण्याकरिता होता. त्यांना नुसतेच 'धर्मांतर' नको होते तर भारतीयांच्या आचार-विचारांचेही 'पाश्चात्ती'करण पाहिजे होते. ग्रेव्ह (Graves) हा अमेरिकन धर्मप्रसारक म्हणतो,

"The language of Marathas as well as the people themselves, must be Christanized."

मोल्सवर्थ (Molesworth) यानी मराठीतला पहिला शब्दकोश लिहिला. आपल्या प्रस्तावनेत ते म्हणतात,

"It was undertaken from a desire to promote the propagation of the glorious gospel and it has been continued by the energy of this desire."

बहुतेक सर्व धर्मप्रसारकच नाही, तर भारतीय भाषा आणि संस्कृतीचे तत्कालीन पाश्चात्य अभ्यासक आणि संशोधकांचे कमी अधिक प्रमाणात हेच मत होते. यावर आज भरपूर संशोधन उपलब्ध आहे.

भाषा म्हणजे नुसती 'मुळाक्षरे' नसतात तर ते एक सांस्कृतिक 'अनुभवाचे' संचित असते. भाषेच्या 'प्रमाणिकरणा'करता जसे व्याकरण लागते तसे शब्दकोश आणि ज्ञानकोशही लागतात. दक्षिणेपासून ते उत्तरेपर्यंतच्या सर्व प्रमुख भाषांची व्याकरणेच नाहीत, तर शब्दकोश आणि ज्ञानकोशही प्रामुख्याने या धर्मप्रसारकांनीच केले आहेत.

'प्रगल्भ' भारतीय तत्त्वज्ञान आणि संस्कृतीच्या प्रचंड 'वृक्षा'ची पाळेमुळे किंवा 'शक्तीस्थान' म्हणजे त्यांच्या 'सामाजिक' आणि 'सांस्कृतिक' संस्था आहेत, हेही ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या लक्षात आले. यातूनच या संस्थांच्या मूळ वास्तवांचे 'विपर्यास' करणारी चिकित्सा त्यांनी चालू केली. काळानुरूप प्रत्येक समाजामध्ये बदल हा अपेक्षित असतो, पण 'सुधारणा' म्हणजे 'मोडतोड' नसते. भारतातील इंग्रजी शिक्षणाचा पाया आणि भूमिका ही याच मोडतोडीच्या मानसिकतेतून १८३५ ला जन्माला आली. या भूमिकेचा शिल्पकार टी. बी. मेकॉले (T. B. Macaulay, 1800-1859) याचे लिखाण याच्या समर्थनार्थ पुरेसे आहे. १८३५ सालचा

विल्यम ॲडम (William Adam, 1796-1881) चा बंगाल आणि बिहार प्रांताचा, टी. बी. जार्विस (T. B. Jerris) १८२३/२४ सालचा महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटकचा आणि याच सुमाराचा मद्रास इलाख्याचा शैक्षणिक अहवाल, अभ्यासक्रम, शिक्षकांची संख्या, शुल्क इ. सगळ्याची माहिती देत, या प्रांतांच्या प्रत्येक खेड्यात शाळा असल्याचे नोंदवतात. ही माहिती देणारे बहुतेक सर्व हे धर्मप्रसारक किंवा ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासकीय अधिकारीच होते. या सगळ्या अहवालांचे संशोधन करून श्री. धर्मपाल यांचे ''द ब्युटिफल ट्री'' (The Beautiful Tree) हे पुस्तक प्रकाशित होऊनही आज ३५ वर्षे होऊन गेली तरीही हजारो वर्षांच्या अन्यायाच्या भाकड कथा आजही स्वतंत्र भारताच्या 'आर्थिक' आणि 'शैक्षणिक' धोरणाचा पाया असतात, यासारखे दुसरे मोठे दुर्दैव कोणते? याचे श्रेय हे सांस्कृतिक वसाहतवादाचे जनक धर्मप्रसारकांना द्यायचे की प्रबोधनापेक्षा सवंग लोकप्रियतेच्या आहारी गेलेल्या आपल्या राजकीय मानसिकतेला हे सांगता येणं अशक्य आहे.

ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी केलेल्या या मोडतोडीची किंमत आजही आपण भोगत आहोत. इंग्लंडला १९३१ साली 'गोलमेज' परिषदेकरता गेले असतांना महात्मा गांधींनी याचे अचूक वर्णन केले आहे.

"..... the British administrators, when they came to India, instead of taking hold of things as they began to root them out. They scratched the soil and began to look at the root... and left the root like that, and the beautiful tree perished."

ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या दोन-तीनशे वर्षांच्या अथक प्रयत्नांतून लोकसंखेच्या तुलनेने धर्मांतर फार झालं असं म्हणता येणार नाही. पण सांस्कृतिक 'वसाहत'वाद प्रस्थापितच नाही तर 'घट्ट' करण्यात ते अपेक्षेबाहेर यशस्वी झाले.

इंग्रजांच्या भाषेबरोबरच त्यांची 'चिकाटी', 'शिस्त', 'संयम' आणि 'गुणग्राहकता'ही आपण घेतली असती, तर राणी असूनही, घराणेशाही नसलेली इंग्लंड मधील लोकशाही भारतामधेही रुजली असती. आज 'पाश्चात्य' धर्मप्रसारक नसले, तरी 'भगवी' वस्त्रे घालून बेताल वक्तव्य करणारे धर्ममार्तंड आणि 'शून्य अभ्यास' आणि शून्य 'संशोधना'ची पार्श्वभूमी असलेले 'स्वामी' आणि 'गुरू'ची भारतात सध्या चंगळ आहे. संस्कृती आणि धर्मापुढे 'वसाहतवादा' पेक्षा ते मोठे आव्हान आहे. हे आपल्याला जेव्हां उमगेल आणि 'हे' आमचे प्रतिनिधी नाहीत हे सांगण्याचे धाडस जेव्हां आपल्यात येईल, तो सुदिन समजायचा!

•••

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१